सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १२

# मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९

(दिनांक १५ जानेवारी, २००८ पर्यंत सुधारित)

# BOMBAY ACT No. XII OF 1960

## The Bombay Homoeopathic Practitioners' Act, 1959

*(As modified upto the 15th January, 2008)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१०

[ किंमत :        रुपये ]

# सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १२.

# मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**कलमे**

**१.** संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**२.** व्याख्या.

प्रकरण दोन

**परिषदेची रचना, कार्ये व अधिकार**

**३.** परिषदेची स्थापना व विधिसंस्थापन आणि प्रशासकाची नेमणूक.

**३क.** परिषदेची रचना.

**४.** सदस्य, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीची वेळ, ठिकाण व रीत.

**५.** पदावधी.

**६.** परिषदेचा कालावधी वाढविणे.

**७.** नैमित्तिक रिक्त पदे.

**८.** राजीनामा.

**९.** अनर्हता व विकलांगता.

**१०.** परिषदेच्या सभा.

**११.** सभेतील कामकाज व कृतींची विधिग्राह्यता.

**१२.** सभांसाठी फी व भत्ते.

**१३.** परिषदेचे उत्पन्न व खर्च.

**१४.** परिषदेचे अधिकार, कर्तव्ये व कार्ये.

**१५.** प्रबंधक व परिषदेचे इतर कर्मचारी.

**१५क.** परिषदेची कार्यकारी समिती.

प्रकरण तीन

**१६.** [वगळण्यात आले].

**१७.** [वगळण्यात आले].

**१८.** [वगळण्यात आले].

**१९.** [वगळण्यात आले].

**१९क.** [वगळण्यात आले].

**अनुक्रमणिका**—चालू

प्रकरण चार

**वैद्यक व्यवसायींची नोंदणी**

२०. नोंदवही तयार करणे.

२१. [वगळण्यात आले].

२२. नोंदवहीत नाव दाखल करण्यासाठी द्यावयाचे अभिवचन.

२३. नोंदवहीतून नाव काढून टाकणे.

२४. नोंदणी केली जाण्याचा हक्क नसलेल्या व्यक्ती.

२५. नोंदवही ठेवणे.

२६. नोंदणीचे नवीकरण.

२७. फी परत न करणे.

२८. नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचा हक्क.

प्रकरण पाच

**परिषद घेईल अशा परीक्षा आणि परिसंस्थांना मान्यता**

२९. परिषद घेईल अशा परीक्षा.

३०. परिसंस्थांना मान्यता देणे.

३१. परिसंस्थांची मान्यता काढून घेणे.

३२. [वगळण्यात आले].

प्रकरण सहा

**संकीर्ण**

३३. नियम.

३४. विनियम.

३५. उपविधी.

३६. राज्य शासनाचे नियंत्रण.

३७. या अधिनियमाखाली काम करणा-या व्यक्तींना मिळणारे हानिरक्षण.

प्रकरण सात

**निरसन व संक्रमणकालीन तरतुदी**

३८. निरसन व व्यावृत्ती.

३९. हक्क, कर्तव्ये, इत्यादी परिषदेकडे निहित असणे आणि व्यावृत्ती.

**अनुक्रमणिका**—चालू

४०. [ वगळण्यात आले ].

४१. [ वगळण्यात आले ].

४२. [ वगळण्यात आले ].

४३. [ वगळण्यात आले ].

४४. [ वगळण्यात आले ].

४५. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

४६. विवक्षित अधिनियमितींची सुधारणा.

**पहिली अनुसूची** [ वगळण्यात आली ].

**दुसरी अनुसूची**

## सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १२[१]

### (मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९)

(या अधिनियमाला राष्ट्रपती यांची अनुमती दिनांक १२ मार्च, १९६० रोजी मिळाली ; ही अनुमती **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार मध्ये दिनांक १८ मार्च, १९६० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आली.)

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम यांद्वारे अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या :—

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ (५-२-१९७५) *

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४† (२८-५-१९७६) *

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ (१६-९-१९७५) *

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ ‡ (१८-१०-१९८४) *

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४@ (२८-१०-१९८५) *

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९@ @ (२४-१०-१९८६) *

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ § (२९-१०-१९८७) *

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ (१-९-१९८८) *

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७∅ (२८-४-१९८८) *

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ (१-९-१९८८) *

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता **मुंबई सरकारचे राजपत्र,** १९५९, भाग पाच, पृष्ठे ६५२-६५५ (इंग्रजी) पहा.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

† सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ३ द्वारे सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दोन निरसित करण्यात आला.

‡ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ३ (१) द्वारे सन १९८४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक नऊ निरसित करण्यात आला.

@ सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ३ (१) द्वारे सन १९८५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सात निरसित करण्यात आला.

@@ सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ३ (१) द्वारे सन १९८६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सात निरसित करण्यात आला.

§ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ३ (१) द्वारे सन १९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक आठ निरसित करण्यात आला.

∅ सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ३ (१) द्वारे सन १९८८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सतरा निरसित करण्यात आला.

**मुंबई राज्यातील होमिओपॅथिक [१][* * *] वैद्यक व्यवसायींच्या अर्हता व नोंदणी यांचे विनियमन करण्यासंबंधीचा कायदा एकत्रित करण्याबाबत व त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यातील होमिओपॅथिक [२][* * *] वैद्यक व्यवसायींच्या अर्हता व नोंदणी यांचे विनियमन करण्यासंबंधीचा कायदा हा, [३][या पद्धतीच्या] अध्ययनास उत्तेजन देण्याच्या व तिचा प्रसार करण्याच्या दृष्टीने एकत्रित करणे व त्यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई होमिओपॅथिक [४][* * *] वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण [५][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [६]दिवशी अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(१) " नियत दिवस " याचा अर्थ, हा अधिनियम ज्या दिवशी अंमलात येईल तो दिवस, असा आहे ;

[७][* * * * *]

[८][* * * * *]

(४) " उपविधी " याचा अर्थ, कलम ३५ खाली केलेले उपविधी, असा आहे ;

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २ द्वारे "व बायोकेमिक" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (अ) द्वारे "व बायोकेमिक" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) द्वारे "ह्या पद्धतींच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "व बायोकेमिक" हा मजकूर वगळण्यात आला.

[५] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, कलम ४ द्वारे "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] दिनांक २७ ऑक्टोबर, १९६१, पहा-शासकीय अधिसूचना, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक बीएचपी-१०५९ (ए) एकीकरण, दिनांक २६ ऑक्टोबर, १९६१.

[७] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (अ) द्वारे खंड (२) वगळण्यात आला.

[८] सन १९८८ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २(अ) द्वारे खंड (३) वगळण्यात आला.

१९७३ चा ५९. [1][(४**क**) "केंद्रीय परिषद" याचा अर्थ, होमिओपॅथी केंद्रीय परिषद अधिनियम, १९७३ याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली होमिओपॅथी केंद्रीय परिषद, असा आहे] ;

[2][(५) "परिषद" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली महाराष्ट्र होमिओपॅथी [3][* * * *] परिषद, असा आहे ;]

[4][* * * *]

[5][(८) "होमिओपॅथी" याचा अर्थ, होमिओपॅथिक वैद्यक पद्धती, असा आहे आणि त्यात बायोकेमिक उपचार पद्धतीचा समावेश होतो ;]

(९) "निरीक्षक", याचा अर्थ, [6] [परिषदेने] नेमलेला निरीक्षक, असा आहे ;

[7][* * * * *]

[8][(११) "सदस्य" याचा अर्थ, परिषदेचा सदस्य, असा आहे ;]

(१२) "वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, होमिओपॅथिक [9][* * * *] वैद्यक पद्धतीने व्यवसाय करणारा वैद्यक व्यवसायी, असा आहे ;

(१३) "अध्यक्ष ", याचा अर्थ, [10] [परिषदेचा] अध्यक्ष, असा आहे ;

(१४) "मान्यताप्राप्त परिसंस्था ", याचा अर्थ, [11] [परिषद] घेईल अशा परीक्षांसाठी असणा-या पाठ्यक्रमांचे शिक्षण देण्यासाठी कलम ३० खाली मान्यता दिलेली कोणतीही परिसंस्था, असा आहे ;

१९७३ चा ५९. [12][(१४**क**) "मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता" याचा अर्थ, होमिओपॅथी केंद्रीय परिषद अधिनियम, १९७३ याच्या दुस-या किंवा तिस-या अनुसूचीत समाविष्ट केलेली, होमिओपॅथी या विषयातील कोणतीही वैद्यकीय अर्हता, असा आहे ; ]

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (ब) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ (ब) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[3] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (क) द्वारे "व बायोकेमिक " हा मजकूर वगळण्यात आला.

[4] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ (क) द्वारे खंड (६) आणि खंड (७) वगळण्यात आले.

[5] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (ड) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[6] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ (ड) द्वारे "विधिसभेने" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम २ (ई) द्वारे खंड (१०) वगळण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम २ (फ) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[9] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (ई) द्वारे "किंवा बायोकेमिक " हा मजकूर वगळण्यात आला.

[10] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ (ग) द्वारे "मंडळाचा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[11] वरील अधिनियमाच्या कलम २ (ह) द्वारे "विधिसभा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[12] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (फ) द्वारे खंड (१४**क**) समाविष्ट करण्यात आला.

(१५) " नोंदवही " याचा अर्थ, कलम २० [1] [* * * *] खाली तयार केलेली व ठेवलेली वैद्यक व्यवसायींची नोंदवही, असा आहे ;

(१६) " नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी " याचा अर्थ, ज्याचे नाव त्या त्या वेळी नोंदवहीत दाखल करण्यात आलेले असेल असा वैद्यक व्यवसायी, असा आहे ;

(१७) " प्रबंधक " याचा अर्थ, कलम १५ खाली नेमलेला प्रबंधक, असा आहे ;

(१८) " विनियम " याचा अर्थ, कलम ३४ खाली केलेले विनियम, असा आहे ;

(१९) " नियम " याचा अर्थ, कलम ३३ खाली केलेले नियम, असा आहे ;

(२०) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची, असा आहे ;

[2][ (२१) " उपाध्यक्ष " याचा अर्थ, परिषदेचा उपाध्यक्ष, असा आहे].

## प्रकरण दोन

### [3][परिषदेची] रचना, कार्ये व अधिकार

**परिषदेची स्थापना व विधिसंस्थापन आणि प्रशासकाची नेमणूक.**

[4][**३.** (१) (क) मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास " महाराष्ट्र होमिओपॅथी [5][* * *] परिषद " म्हणून संबोधण्यात येणारी परिषद स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येईल. (१९८८ चा महा. १६.)

(ख) ही परिषद म्हणजे उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल, आणि तिची अखंड उत्तराधिकार-परंपरा असेल व एक सामाईक मोहोर असेल. तसेच, तिला मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट करण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल आणि तिला किंवा तिच्याविरुद्ध उक्त नावाने दावा लावता येईल.

(२) कलम ३६ किंवा ३९ मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,–

(क) राज्य शासनास, या कलमान्वये कोणत्याही व्यक्तीची प्रशासक म्हणून नियुक्ती करता येईल की जेणेकरून ती व्यक्ती पोट-कलम (३) अन्वये प्रशासकाचे पद धारण करील त्या कालावधीत तिने पोट-कलम (१) अन्वये स्थापन झालेल्या परिषदेचे सर्व अधिकार वापरावेत व परिषदेची सर्व कर्तव्ये पार पाडावीत.

(ख) खंड (क) च्या तरतुदींस बाध न येऊ देता, ' मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५ ' याच्या प्रारंभाच्या दिनांकास व त्या दिनांकापासून, मंडळाच्या किंवा विधिसभेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी कलम ३६ खाली नेमणूक करण्यात आलेली व अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी पद धारण करीत असलेली व्यक्ती ही, प्रशासक म्हणून नेमण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि ती व्यक्ती, पोटकलम (३) अन्वये प्रशासकाचे पद धारण करील त्या कालावधीत पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या परिषदेच्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि तिची सर्व कर्तव्ये पार पाडील. (१९८८ चा महा. १६.)

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ (ग) द्वारे "किंवा कलम २१ " हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ (ज) द्वारे खंड (२१) जादा दाखल करण्यात आला.

[[3] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे "मंडळाची " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.]

[4] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[5] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ६ द्वारे "व बायोकेमिक " हे शब्द वगळण्यात आले.

(३) पोटकलम (२) अन्वये कार्य करणा-या प्रशासकाचा पदावधी, कलम ४, पोटकलम (३), खंड (क) खाली सदस्यांची निवडणूक झाल्यानंतर, ज्या दिनांकास त्या परिषदेची पहिली सभा भरेल त्या दिनांकाच्या लगतपूर्व दिवशी समाप्त होईल.

(४) प्रशासकास, राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील असे वेतन व भत्ते परिषदेच्या निधीमधून देण्यात येतील.]

**परिषदेची रचना.**

[१][**३क.** (१) परिषद ही, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासह पुढील अकरा सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) होमिओपॅथी उप संचालक, पदसिद्ध ;

(ख) होमिओपॅथी [२][* * * * *] या विषयातील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले चार सदस्य ;

(ग) कलम २० खाली ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत ज्यांची नावे नोंदवण्यात आलेली आहेत अशा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींनी आपल्यामधून निवडून दिलेले तीन सदस्य ;

(घ) (एक) मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्राचार्यांनी किंवा प्रमुखांनी आपल्यामधून निवडून दिलेला एक सदस्य ; आणि

(दोन) मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या (प्राचार्य किंवा प्रमुख यांच्या व्यतिरिक्त इतर) अध्यापकांनी आपल्यामधून निवडून दिलेले दोन सदस्य,

असे सदस्य हे, [३][कोणतीही मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता] धारण करणारे आणि कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेत, अशा निवडणुकीकरिता उमेदवारांचे नामनिर्देशन करण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी किमान दोन वर्षांच्या कालावधीसाठी [४][होमिओपॅथिक वैद्यक पध्दतीचे] अध्यापन करणारे नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी असतील :

परंतु, उप खंड (एक) व (दोन) खाली निवडून द्यावयाचे सदस्य हे, पूर्ववर्ती खंडांखाली नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडून दिलेल्या व्यक्तींहून अन्य अशा व्यक्ती असतील.

(२) जर कोणत्याही निवडणुकीत मतदारांनी परिषदेवर आवश्यक तेवढे सदस्य निवडून दिले नाहीत तर, राज्य शासन, निवडणुकीनंतर जी पदे रिक्त राहिली असतील ती पदे भरण्याकरिता, त्यास योग्य वाटतील अशा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींचे नामनिर्देशन करील ; आणि निवडून दिलेल्या सदस्यांबाबतचे किंवा सदस्यांच्या निवडणुकीबाबतचे या अधिनियमातील निर्देश हे, अशा नामनिर्देशन केलेल्या सदस्यांबाबतचे किंवा सदस्यांच्या अशा नामनिर्देशनाबाबतचेही निर्देश आहेत असा त्यांचा अन्वयार्थ लावण्यात येईल.

(३) परिषदेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना परिषदेचे सदस्य, आपल्यामधून गुप्त मतदान पद्धतीने निवडून देतील.]

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ५ द्वारे हे कलम **३क** समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ७ (अ) द्वारे "किंवा बायोकेमिक " हे शब्द वगळण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) (एक) द्वारे " पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारण करीत असतील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) (दोन) द्वारे "होमिओपॅथिक किंवा बायोकेमिक या वैद्यक शास्त्राच्या कोणत्याही विद्याशाखेत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**सदस्य, [6][अध्यक्ष व उपाध्यक्ष] यांच्या निवडणुकीची वेळ, ठिकाण व रीत.**

**४.** (१) [1][(क)] [2][कलम **३ क**] खालील सदस्यांची निवडणूक ही, नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा वेळी, अशा ठिकाणी व अशा रीतीने घेण्यात येईल.

[1][(ख) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निवडणुकीच्या संबंधात कोणताही विवाद उद्‌भवल्यास तो, [3][निवडणुकीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत] राज्य शासनाकडे निर्णयासाठी निर्देशित करण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल].

(२) प्रबंधक, [4][परिषदेच्या] निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या कमीत कमी तीन महिने अगोदर, नोंदवहीत त्या त्या वेळी दाखल केलेल्या सर्व वैद्यक व्यवसायींची नावे व अर्हता आणि अशा अर्हता ज्या दिनांकांना संपादन केल्या असतील ते दिनांक यांची बिनचूक यादी छापण्याची व प्रसिध्द करण्याची व्यवस्था करील.

[5][(३) (क) पूर्वगामी तरतुदींखाली सदस्यांचे नामनिर्देशन व निवडणूक झाल्यानंतर सात दिवसांच्या आत, होमिओपॅथी उप संचालक, निश्चित करील अशा दिनांकास अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडून देण्यासाठी सभा बोलवण्यात येईल. ही निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल.

(ख) खंड (क) खाली बोलावण्यात येणा-या सभेचे अध्यक्षस्थान होमिओपॅथी उप संचालक स्वीकारील आणि त्यास मतदानाचा हक्क राहील. अशा सभेचा अध्यक्ष असलेल्या उप संचालकास, (या कलमात यापुढे ज्याचा उल्लेख " पीठासीन अधिकारी "असा करण्यात आला आहे) त्याच्या मते पुरेशी असतील अशी कारणे लेखी नमूद करून, त्या कारणास्तव अशी सभा स्थगित करण्यास नकार देता येईल किंवा यथास्थिति, अशी सभा स्थगित करता येईल.

(ग) जर अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, पीठासीन अधिकारी निश्चित करील अशा रीतीने, त्याच्या समक्ष चिठ्ठया टाकून निवडणुकीचा निकाल देण्यात येईल.

(घ) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीच्या विधिग्राहयतेबाबत विवाद उद्‌भवल्यास, पीठासीन अधिका-याला, निवडणुकीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, तो विवाद निर्णयासाठी राज्य शासनाकडे निर्देशित करता येईल. अशा विवादाबाबत राज्य शासनाचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल व त्यावर कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही.

(४) पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रसंगाखेरीज अन्य कोणत्याही प्रसंगी, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक, त्यांचा पदावधी संपण्याअगोदर अथवा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांचे पद नैमित्तिकरीत्या रिक्त झाल्यास त्यानंतर शक्य तितक्या लवकरच, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने घेण्यात येईल.]

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ द्वारे कलम ४ (१) याला खंड (क) असा नविन क्रमांक देण्यात आला व त्यानंतर खंड (ख) समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम (६) (अ) (एक) द्वारे " कलम ३ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ६ (अ) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) द्वारे "मंडळाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ६ (क) द्वारे ही पोटकलमे जादा दाखल करण्यात आली.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ड) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

**५.** (१) या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून अन्य बाबतीत, निवडून दिलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा पदावधी हा, [१][कलम ४, पोटकलम (३) च्या खंड (क) अन्वये] [२][परिषदेची] पहिली सभा ज्या दिनांकास भरेल त्या दिनांकापासून सुरू होणारा पाच वर्षाचा कालावधी इतका असेल. **पदावधी.**

(२) मावळत्या सदस्याचा पदावधी हा, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पहिल्या सभेच्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आला असल्याचे आणि तो त्या दिवशी संपत असल्याचे मानण्यात येईल.

(३) मावळता सदस्य हा, पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असेल.

[३][(४) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधी, त्यांची अध्यक्ष किंवा यथास्थिति, उपाध्यक्ष म्हणून निवडणूक झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष इतका असेल :

परंतु, कोणत्याही वेळी अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांचा पदावधी हा, अशा अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा सदस्य म्हणून जितका पदावधी असेल त्यापेक्षा अधिक असणार नाही.]

**६.** कलम ५ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे [४][परिषदेच्या] सदस्यांचा एकूण पदावधी हा, एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही इतक्या कालावधीपर्यंत आणखी वाढविता येईल. **[४][परिषदेचा] कालावधी वाढविणे.**

**७.** [५][(१) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष पदावर असताना त्याचा मृत्यू झाल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्यास पदावरून काढून टाकल्यामुळे, तो विकलांग झाल्यामुळे किंवा तो अनर्ह ठरल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांचे पद त्यांचा पदावधी संपण्यापूर्वी केव्हाही नैमित्तिकरीत्या रिक्त झाल्यास ते कोणतेही पद निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.] **नैमित्तिक रिक्त पदे.**

(२) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या, [६][परिषदेच्या] सदस्याचे रिक्त झालेले कोणतेही पद, नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.

[७][(३) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य वा प्रमुख अथवा अध्यापक यांनी निवडून दिलेल्या, परिषदेच्या सदस्याचे रिक्त झालेले असे कोणतेही पद हे, परिषदेच्या त्यावेळच्या सर्व सदस्यांनी बहुमताने संमत केलेल्या परिषदेच्या ठरावाद्वारे शिफारस केल्याप्रमाणे, यथास्थिति तीन नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी, किंवा प्राचार्य वा प्रमुख अथवा अध्यापक यांच्या नामिकेमधून एखाद्या व्यक्तीचे राज्य शासनाकडून नामनिर्देशन करून भरण्यात येईल :

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ७ (अ) (दोन) द्वारे "कलम ३ अन्वये सदस्यांची निवडणूक झाल्यानंतर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ (अ) (एक) द्वारे "मंडळाची " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) द्वारे पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे "मंडळाचा " या शब्दाऐवजी "परिषद " हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९ (अ) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ब) द्वारे "मंडळाच्या " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ९ (क) द्वारे मूळ पोट-कलम (३) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

परंतु, असे पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत परिषदेने असा ठराव संमत केला नाही तर त्याबाबतीत, राज्य शासनाला असे रिक्त पद भरण्यासाठी, यथास्थिति, कोणत्याही नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीची किंवा प्राचार्याची वा प्रमुखाची अथवा अध्यापकाची त्या जागी नेमणूक करता येईल आणि अशा प्रकारे नेमणूक करण्यात आलेल्या वैद्यक व्यवसायीचे किंवा प्राचार्याचे वा प्रमुखाचे अथवा अध्यापकाचे रीतसर नामनिर्देशन केले आहे असे या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी मानण्यात येईल.].

(४) या कलमाखाली नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी नामनिर्देशित केलेली किंवा निवडून दिलेली कोणतीही व्यक्ती, कलम ५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीच्या जागी ती नामनिर्देशित केलेली किंवा निवडून दिलेली असेल त्या व्यक्तीने उक्त पद रिक्त झाले नसते तर जोपर्यंत पद धारण केले असते तोपर्यंत ते पद धारण करील.

**राजीनामा.** [१][८. (१) नामनिर्देशित सदस्याला, राज्य शासनाकडे लेखी नोटीस पाठवून कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. निवडून आलेल्या सदस्याला, अध्यक्षाकडे लेखी नोटीस पाठवून कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. असा राजीनामा राज्य शासन किंवा यथास्थिति, अध्यक्ष स्वीकारील त्या दिनांकापासून अंमलात येईल.

(२) अध्यक्षाला किंवा उपाध्यक्षाला, राज्य शासनाकडे लेखी नोटीस पाठवून कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. असा राजीनामा, राज्य शासन स्वीकारील त्या दिनांकापासून अंमलात येईल.]

**अनर्हता व विकलांगता.** **९.** (१) जर कोणतीही व्यक्ती,–

(क) अमुक्त दिवाळखोर असेल ;

(ख) सक्षम न्यायालयाने विकल मनाची म्हणून ठरवली असेल ;

(ग) जिचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल ; किंवा

(घ) [२][परिषदेची] पूर्णकालिक अधिकारी किंवा कर्मचारी असेल ; [३][* *]

तर ती, सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नामनिर्देशित होण्यास किंवा सदस्य असणे चालू राहण्यास पात्र असणार नाही.

(२) जर कोणताही सदस्य,—

(क) अध्यक्षाच्या [४][आणि उपाध्यक्षाच्या] बाबतीत राज्य शासनाच्या मते, आणि इतर कोणत्याही सदस्याच्या बाबतीत [५][परिषदेच्या] मते पुरेशी नसतील अशा कारणांशिवाय [५][परिषदेच्या] लागोपाठच्या तीन सर्वसाधारण सभांना अनुपस्थित राहिला असेल ; किंवा

(ख) पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या अनर्हतांपैकी कोणत्याही अनर्हतेस पात्र ठरला असेल किंवा पात्र असल्याचे आढळून आले असेल तर,

त्याचे पद रिक्त झाले आहे असे राज्य शासन घोषित करील.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १० द्वारे मूळ कलम ८ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ११ (अ) द्वारे "मंडळाची किंवा विधिसभेची " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ८ द्वारे "किंवा " हा शब्द वगळण्यात आला.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ११ (ब) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) (एक) द्वारे "मंडळाच्या " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(३) या अधिनियमान्वये निवडून दिलेला किंवा नामनिर्देशित केलेला कोणताही सदस्य, सदस्य म्हणून आपली कर्तव्ये बजावीत असताना गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही लांच्छनास्पद वर्तणुकीबद्दल दोषी ठरल्यास किंवा सदस्य म्हणून आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ ठरल्यास, राज्य शासन, सदस्यांच्या एकूण संख्येपैकी कमीत कमी दोन-तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या [१][परिषदेच्या] शिफारशीवरून त्या सदस्याला पदावरून काढून टाकू शकेल :

परंतु, [२][परिषद], कोणत्याही सदस्यास पदावरून काढून टाकण्याची शिफारस करणारा कोणताही ठराव, तो ज्याच्या संबंधात असेल त्या सदस्यास, अशी शिफारस का करण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखवण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, संमत करणार नाही.

**१०.** (१) [२][परिषदेच्या] सभा, नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा रीतीने बोलावण्यात येतील, भरवण्यात येतील आणि त्यांचे कामकाज चालवण्यात येईल. **[७][परिषदेच्या] सभा.**

[३][(२) अध्यक्ष उपस्थित असेल तर, तो परिषदेच्या प्रत्येक सभेच्या अध्यक्षस्थानी राहील. जर कोणत्याही सभेत अध्यक्ष अनुपस्थित असेल तर उपाध्यक्ष, आणि दोघेही अनुपस्थित असतील तर, उपस्थित असलेल्या सदस्यांनी आपल्यामधून निवडून दिलेला अन्य एखादा सदस्य अशा सभेच्या अध्यक्षस्थानी राहील.]

(३) [४][परिषदेच्या] सभेतील सर्व प्रश्नांचा निर्णय सभेत उपस्थित असलेल्या व मतदान करणा-या सदस्यांच्या बहुमताने घेण्यात येईल.

[५][(४) समसमान मते पडल्यास, सभेच्या पीठासीन अधिका-याला दुसरे किंवा निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल व तो त्याचा वापर करील.]

(५) [६][अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासह परिषदेच्या सहा सदस्यांची] मिळून गणपूर्ती होईल. गणपूर्तीची आवश्यकता असेल, परंतु तेवढे सदस्य उपस्थित नसतील तेव्हा पीठासीन अधिकारी, तो अधिसूचित करील अशा नंतरच्या किंवा इतर कोणत्याही पुढील दिवसाच्या वेळेपर्यंत सभा स्थगित करील आणि जर सभेत गणपूर्ती झाली असती तर, मूळ सभेपुढे जे कामकाज आणण्यात आले असते ते कामकाज स्थगित केलेल्या सभेपुढे आणण्यात येईल आणि अशा सभेत किंवा स्थगित केलेल्या त्या नंतरच्या कोणत्याही सभेत-मग गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असतील तितके सदस्य उपस्थित असोत किंवा नसोत– कामकाज निकालात काढता येईल.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ११ (क) द्वारे “मंडळाच्या ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२ (अ) द्वारे “मंडळ ” या शब्दाऐवजी “परिषद ” हा शब्द व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२ (क) द्वारे “मंडळाच्या ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ड) द्वारे मूळ पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ई) द्वारे “अध्यक्षाचा समावेश करुन आठ सदस्यांची ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १२ (फ) द्वारे “मंडळाच्या ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**सभेतील कामकाज व कृतींची विधिग्राह्यता.**

**११.** (१) [1][परिषदेच्या] प्रत्येक सभेचे कामकाज गोपनीय असल्याचे समजण्यात येईल आणि कोणत्याही व्यक्तीला [1][परिषदेची] आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय कामकाजाचा कोणताही भाग उघड करता येणार नाही :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे [1][परिषदेने] संमत केलेल्या किंवा विचारात घेतलेल्या कोणत्याही ठरावातील मजकूर, असा ठराव गोपनीय समजण्यात यावा असा [1][परिषदेने] निदेश दिलेला नसेल तर, उघड करण्यास किंवा प्रसिध्द करण्यास कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंध होतो असे मानण्यात येणार नाही.

(२) सभेत सदस्य म्हणून किंवा अध्यक्ष म्हणून [2][किंवा उपाध्यक्ष म्हणून] किंवा पीठासीन अधिकारी म्हणून, कोणतीही एखादी व्यक्ती अनर्ह असणे किंवा तिच्या निवडणुकीत, नामनिर्देशनात किंवा नेमणुकीत दोष असणे केवळ याच कारणामुळे [3][परिषदेच्या] ज्या कृतीत किंवा कामकाजात अशा व्यक्तीने भाग घेतला असेल ती कृती किंवा ते कामकाज, जेव्हा जेव्हा, अशा कृतीत किंवा कामकाजात भाग घेणा-या बहुसंख्य व्यक्तींना मतदानाचा अधिकार असेल तेव्हा तेव्हा, निष्फळ ठरते असे मानण्यात येणार नाही.

(३) [4][परिषदेत] कोणतेही पद रिक्त असताना, विद्यमान सदस्यांना जणू काही कोणतेही पद रिक्त नाही असे समजून काम करता येईल.

**सभांसाठी फी व भत्ते.**

[5][**१२.** परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर सदस्य यांना आणि समित्यांच्या सदस्यांना सभेला उपस्थित राहण्याबद्दल नियमांद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते आणि असा प्रवास भत्ता देण्यात येईल.]

**परिषदेचे उत्पन्न व खर्च.**

[6][**१३.** (१) परिषदेच्या उत्पन्नामध्ये पुढील रकमांचा समावेश असेल :—

(क) वैद्यक व्यवसायींकडून मिळालेल्या फीच्या रकमा ;

(ख) परीक्षार्थ्यांकडून मिळालेल्या फीच्या रकमा ;

(ग) परिषदेने वसूल केलेल्या इतर कोणत्याही फीच्या रकमा ;

(घ) राज्य शासनाकडून मिळालेली अनुदाने ;

(ङ) परिषदेला मिळालेल्या देणग्या आणि कोणत्याही इतर रकमा.

(२) परिषद, पुढील प्रयोजनांसाठी खर्च करण्यास सक्षम असेल :—

(क) प्रबंधकाचे आणि परिषदेने नेमलेल्या निरीक्षकांसह कर्मचा-यांचे वेतन व भत्ते ;

(ख) परिषदेच्या सदस्यांना, तिच्या समित्यांना देण्यात येणारी फी व भत्ते ;

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १३ (अ) द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी " परिषद " हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १३ (ब) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १३ (ब) (दोन) द्वारे " मंडळाच्या " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) द्वारे " मंडळात " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे मूळ कलम १२ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे मूळ कलम १३ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(ग) प्राश्निक (paper setters), परीक्षक, नियामक आणि परीक्षा घेण्यासाठी परिषदेकडून नेमण्यात आलेल्या इतर व्यक्ती यांना देण्यात येणारे पारिश्रमिक ;

(घ) परीक्षा चालनावरील इतर खर्च ;

(ङ) हा अधिनियम, त्याखाली केलेले नियम किंवा परिषदेने केलेले विनियम किंवा उपविधी यांखालील कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असा इतर खर्च].

**परिषदेचे अधिकार, कर्तव्ये व कार्ये.**

[१][**१४.** या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून, परिषदेचे अधिकार, कर्तव्ये आणि कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) वैद्यक व्यवसायींची नोंदणी करण्याची व्यवस्था करणे आणि नोंदवहीत नोंदी ठेवणे ;

(ख) प्रबंधकाच्या कोणत्याही निणर्यावर करण्यात आलेल्या अपिलांची सुनावणी करणे आणि त्याबाबत निर्णय देणे ;

(ग) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस ताकीद देणे अथवा त्याचे नाव नोंदवहीतून तात्पुरते काढून टाकणे किंवा कायमचे काढून टाकणे अथवा त्याच्याविरुध्द परिषदेच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशी इतर शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(घ) परीक्षा घेणे, अशा परीक्षांसाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करणे आणि त्यांसाठी फी आकारणे ;

(ङ) परिषदेकडून घेण्यात येणा-या परीक्षांसाठी प्रशिक्षणाचे पाठ्यक्रम [२][* * * *] चालवणे ;

(च) पदव्या, पदविका आणि सन्मानचिन्हे प्रदान करणे ;

(छ) विद्यावेतने, शिष्यवृत्त्या, पदके, पारितोषिके आणि इतर बक्षिसे देणे ;

(ज) परिषदेकडून घेण्यात येणा-या परीक्षांच्या पाठ्यक्रमाचे प्रशिक्षण देण्याच्या प्रयोजनाकरिता, परिसंस्थांना मान्यता देण्याची शिफारस करणे, किंवा अशी मान्यता रद्द करण्याची शिफारस करणे ;

[३][* * * * * *]

(ञ) पाठ्यपुस्तके तयार करणे, प्रसिध्द करणे आणि विहित करणे आणि [४][केंद्रीय परिषदेने विहित केलेल्या पाठ्यक्रमांची पत्रके] प्रसिद्ध करणे ;

(ट) होमिओपॅथिक [५][वैद्यक पद्धतीच्या] व्यवसायासाठी आवश्यक त्या प्रावीण्याचा योग्य तो दर्जा राखण्याबाबत तरतूद करणे ;

(ठ) ग्रंथालये स्थापन करणे व ती सुस्थितीत ठेवणे ;

(ड) होमिओपॅथी व बायोकेमिस्ट्री या विषयांच्या पदव्युत्तर प्रशिक्षणविषयक व संशोधनविषयक योजनांची शिफारस करणे व त्यांस उत्तेजन देणे ;

(ढ) मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अथवा [६][मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हतांपैकी] कोणत्याही अर्हतेसाठी शिक्षण देणा-या कोणत्याही इतर परिसंस्थांच्या तपासणीसाठी तरतूद करणे आणि आवश्यक असेल अशी माहिती देण्याविषयी अशा परिसंस्थांना फर्मावणे ;

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १६ द्वारे मूळ कलम १४ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ९ (अ) द्वारे " विहित करणे आणि ते " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ब) द्वारे खंड (झ) वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ९ (क) द्वारे " विहित केलेल्या पाठ्यक्रमाची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ड) द्वारे " व बायोकेमिक वैद्यक पध्दतींच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ई) द्वारे " पहिल्या अनुसूचीत समाविष्ट केलेल्या अर्हतांपैकी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ण) अभ्यास मंडळांची (बोर्ड ऑफ स्टडीज्) व समित्यांची नेमणूक करणे. अशा अभ्यास मंडळांमध्ये किंवा समित्यांमध्ये परिषदेचा सदस्य असलेल्या किंवा नसलेल्या व्यक्तींचाही समावेश असेल. मात्र, अशा व्यक्तींपैकी किमान निम्म्या व्यक्ती या, वैद्यक व्यवसायींच्या नोंदवहीत ज्यांच्या नावांची नोंद झालेली आहे अशा वैद्यक व्यवसायी व्यक्ती असतील. तसेच, अशा मंडळांची किंवा समित्यांची रचना, कर्तव्ये व कार्ये यांसाठी विनियम तयार करणे ;

(त) राज्य शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून, देणग्या स्वीकारणे आणि त्या स्वीकारण्याच्या शर्ती निर्धारित करणे ;

(थ) या अधिनियमात नेमून दिलेले असतील अशा किंवा नियमांद्वारे किंवा विनियमांद्वारे किंवा उपविधींद्वारे विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि अशी इतर कर्तव्ये व कार्ये पार पाडणे.]

**प्रबंधक व [6][परिषदेचे] इतर कर्मचारी.**

**१५.** [1][(१) राज्य शासन, परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, प्रबंधकाची नेमणूक करील व तो परिषदेचा सचिव आणि कार्यकारी अधिकारी असेल. प्रबंधकाचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती नियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.]

(२) [2][परिषद], प्रबंधकाला वेळोवेळी रजा मंजूर करू शकेल :

परंतु, जर रजेचा कालावधी दोन महिन्यांहून अधिक नसेल तर, अध्यक्षास अशी रजा मंजूर करता येईल.

(३) रजेमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे प्रबंधकाचे पद अशा रीतीने तात्पुरते रिक्त झाल्यास त्या कालावधीत, त्याच्या जागी काम करण्यासाठी [3][परिषदेस] राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने दुस-या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि याप्रमाणे नेमण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, अशा नेमणुकीच्या कालावधीत, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ प्रबंधक आहे असे मानण्यात येईल :

परंतु, अशा रिक्त पदाचा कालावधी दोन महिन्यांहून अधिक नसेल तर, अध्यक्षास अशी नेमणूक करता येईल आणि तो अशा नेमणुकीसंबंधी राज्य शासनाला ताबडतोब कळवील.

[4][(४) राज्य शासनास, परिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, प्रबंधक म्हणून नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीला निलंबित, बडतर्फ किंवा पदावरून दूर करता येईल ; किंवा त्यास आवश्यक वाटेल अशी इतर कोणतीही शास्ती त्या व्यक्तीवर लादता येईल.]

[5][ * * * * * *]

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १७ (अ) द्वारे मूळ पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १७ (क) द्वारे " मंडळास " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ड) द्वारे मूळ पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ई) द्वारे पोट-कलम (५) वगळण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ग) द्वारे " मंडळाचे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(६) [1][परिषद], या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, आवश्यक असतील अशा इतर अधिका-यांची व कर्मचा-यांची संख्या व पदनामे आणि त्यांचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती, विनियमांद्वारे वेळोवेळी विहित करील :

परंतु, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक करण्याचा अधिकार अध्यक्षाकडे निहित असेल.

१८६० चा ४५. (७) प्रबंधक आणि या कलमान्वये नेमलेला इतर कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

[2][**१५क.** (१) [3][परिषद], शक्य तितक्या लवकर, एक कार्यकारी समिती स्थापन करील. ही समिती, अध्यक्ष, पदसिद्ध सदस्य आणि [3][परिषद], नियमांद्वारे विहित करील इतके, आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेले इतर सदस्य यांची मिळून बनलेली असेल. **[3][परिषदेची] कार्यकारी समिती.**

(२) कार्यकारी समितीच्या सदस्यांचा पदावधी, सदस्यांची नैमित्तिकरीत्या रिक्त झालेली पदे भरण्याची रीत व त्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती ही, नियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) कार्यकारी समिती, नियमांद्वारे [3][परिषद] तिच्याकडे प्रत्यायोजित करील किंवा वेळोवेळी तिच्याकडे सोपवील अशा [3][परिषदेच्या] अधिकारांचा वापर करील, अशी तिची कर्तव्ये बजावील व अशी तिची कार्ये पार पाडील.]

## प्रकरण तीन

[सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १९ द्वारे वगळण्यात आले]

## प्रकरण चार

## [4][वैद्यक व्यवसायींची नोंदणी]

**२०.** (१) नियत दिवसानंतर शक्य तितक्या लवकर, प्रबंधक, या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार [5][महाराष्ट्र राज्याकरिता], होमिओपॅथिक [6][* * * *] वैद्यक व्यवसायींची एक नोंदवही तयार करील आणि त्यानंतर ती सुस्थितीत ठेवील. **नोंदवही तयार करणे.**

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १७ (फ) द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ द्वारे कलम **१५क** समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १८ द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी " परिषद " हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे मूळ शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २१ (अ) द्वारे " मुंबई राज्याकरिता " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १० (अ) द्वारे " व बायोकेमिक " हा मजकूर वगळण्यात आला.

[१][(१ क) नोंदवहीमध्ये पुढील वैद्यक व्यवसायींची नावे अंतर्भूत असतील,—

(एक) ज्यांची नावे पोट-कलम (४) अन्वये नोंदवहीमध्ये असण्याचे चालू ठेवण्यात आली आहेत असे व्यवसायी ; आणि

(दोन) ज्यांची नावे मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्या दिनांकानंतर पोट-कलम (३) किंवा (५) अन्वये नोंदवहीमध्ये नोंदवण्यात आली असतील, असे व्यवसायी]. १९८८ चा महा. १६.

(२) नोंदवहीमध्ये पुढील तपशील अंतर्भूत असेल :—

(क) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे पूर्ण नाव, राष्ट्रीयत्व व त्याच्या निवासस्थानाचा पत्ता ;

(ख) नोंदवहीत त्याचे नाव दाखल केल्याचा दिनांक ;

(ग) नोंदणीसाठी असलेली अर्हता आणि त्याने होमिओपॅथी [२][* * * *] या मधील त्याची पदवी, पदविका किंवा इतर कोणताही तत्सम पुरस्कार असल्यास, तो मिळवल्याचा दिनांक आणि ज्या प्राधिकरणाने तो प्रदान केला असेल किंवा दिला असेल ते प्राधिकरण ;

(घ) त्याच्या व्यवसायाच्या ठिकाणाचा पत्ता ; आणि

(ङ) नियमांद्वारे विहित करण्यात येईल असा आणखी तपशील.

(३) जी व्यक्ती कोणतीही [३][मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता] धारण करीत असेल, अशी प्रत्येक व्यक्ती कोणत्याही वेळी अथवा नियमांद्वारे विहित केलेल्या नमुन्यात प्रबंधकाकडे अर्ज केल्यावर आणि [४][तीनशे रुपये] फी भरल्यावर, नोंदवहीत आपले नाव नोंदवून घेण्यास हक्कदार असेल.

[५][(४) या कलमाखाली ठेवण्यात आलेली आणि मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५ (यापुढे या पोट-कलमात ज्याचा निर्देश " सुधारणा अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्व दिवशी अंमलात असलेली नोंदवही ही, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये ठेवण्यात आलेली नोंदवही आहे, असे मानण्यात येईल आणि अशा नोंदवहीत नोंदविण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नाव, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, नोंदवहीत समाविष्ट असण्याचे चालू राहील. १९८८ चा महा. १६.

(५) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, होमिओपॅथिक केंद्रीय परिषद अधिनियम, १९७३ अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत नाव नोंदवण्यास हक्कदार असलेली किंवा नाव नोंदवलेली, परंतु या अधिनियमाखाली ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत नाव न नोंदवलेली प्रत्येक व्यक्ती, तिने अर्ज केल्यानंतर आणि पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे फी भरल्यानंतर, या अधिनियमान्वये ठेवलेल्या नोंदवहीत, नाव नोंदवून घेण्यास हक्कदार असेल.] १९७३ चा ५९.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १० (ब) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १० (क) द्वारे " किंवा बायोकेमेस्ट्री " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० (ड) (एक) द्वारे " पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली कोणतीही अर्हता " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १० (ड) (दोन) द्वारे " शंभर रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २१ (क) द्वारे मूळ पोट-कलमे (४) ते (११) या ऐवजी पोट-कलमे (४) व (५) दाखल करण्यात आली.

(१२) (क) प्रत्येक नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीला, नियमांद्वारे विहित केलेल्या नमुन्यामध्ये नोंदणीचे प्रमाणपत्र देण्यात येईल ; [1][तसेच तो केवळ [2][होमिओपॅथी वैद्यक पध्दतीच्या आधारे] व्यवसाय करील. नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी आपले नोंदणी प्रमाणपत्र आपल्या दवाखान्यात, चिकित्सालयात किंवा व्यवसायाच्या ठिकाणी ठळक जागी लावील ].

[3][(ख) असे प्रमाणपत्र, ते रीतसर रद्द करण्यात येईतोपर्यंत, आणि या अधिनियमाच्या तरतुदींखाली वैद्यक व्यवसायीचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात येईतोपर्यंत, विधिग्राह्य असेल आणि मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेले आणि अशा प्रारंभाच्या दिनांकास विधिग्राह्य असलेले प्रत्येक नोंदणी प्रमाणपत्र, कलम २६ च्या तरतुदींच्या अधीन राहून, तशाच रीतीने विधिग्राह्य असेल व तदनुसार पुढे चालू राहील.]

१९७४ चा महा. ३९.

[4][(ग) नोंदणी प्रमाणपत्र विरूप झालेले आहे, गहाळ झालेले आहे, किंवा नष्ट झालेले आहे याबाबत प्रबंधकाची खात्री पटेल अशा रीतीने ती बाब त्याच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यानंतर, विहित फी भरण्यात आल्यावर खंड (क) अन्वये विहित केलेल्या नमुन्यात प्रमाणपत्राची दुसरी प्रत देता येईल.]

१९८८ चा महा. १६.

[5][(१३) (क) ज्या कोणत्याही नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस, मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवशी नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले असेल व असे प्रमाणपत्र अजून प्रवर्तनात असेल तर, पूर्वी दिलेल्या प्रमाणपत्राऐवजी आपणास नवीन प्रमाणपत्र देण्यात यावे यासाठी त्याला कोणत्याही वेळी प्रबंधकाकडे, असे (मूळ) प्रमाणपत्र व पाच रुपये फी यासह लेखी अर्ज करता येईल.

(ख) असा अर्ज मिळाल्यावर, प्रबंधक असे प्रमाणपत्र रद्द करील आणि पोट-कलम (१२) च्या खंड (क) खाली नियमांद्वारे विहित केलेल्या नमुन्यात नवीन नोंदणी प्रमाणपत्र देईल.]

**२१.** [संबंधित दिवशी ज्यांचा व्यवसाय चालू असेल अशा व्यक्तींची यादी तयार करणे.] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ११ द्वारे हे कलम वगळण्यात आले.

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २१ (ड) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १० (ई) द्वारे " होमिओपॅथिक व बायोकेमिक औषध पद्धतीच्या " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम २ (ब) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (ख) दाखल करण्यात आला.

[4] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २१ (ड) (दोन) द्वारे खंड (ग) जादा दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २१ (ई) द्वारे पोट-कलम (१३) जादा दाखल करण्यात आले.

**नोंदवहीत [10][* * *] नाव दाखल करण्यासाठी द्यावयाचे अभिवचन.**

**२२.** [1][कलम २० मध्ये] काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही वैद्यक व्यवसायीने भारतीय वैद्यकीय पदवी अधिनियम, १९१६, भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६, [2][महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१] यांखाली किंवा [3][महाराष्ट्र राज्याच्या] कोणत्याही भागात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याखाली प्राधिकृत केलेला निकाय किंवा परिसंस्था देत असेल अशी कोणतीही पदवी, पदविका, [4][लायसन किंवा प्रमाणपत्र] यांच्याशी तंतोतंत जुळणारी किंवा त्याची ख-यासारखी नक्कल असेल अशी कोणतीही पदवी, पदविका, [4][लायसन किंवा प्रमाणपत्र] आपण वापरणार नाही अशा आशयाचे, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने निष्पादित केलेले लेखी अभिवचन दिलेले असल्याखेरीज, अशा कोणत्याही वैद्यक व्यवसायीचे नाव नोंदवहीत [5][* * * *] दाखल केले जाणार नाही. अशा व्यक्तीने तिचे नाव या अधिनियमाखालील नोंदवहीत [6][* * * *] दाखल करण्यात आले आहे हे दर्शवण्याकरिता आपल्या नावापुढे पूर्ण शब्दात "नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी" [7][* * * *] [8][* * * *] हे शब्द वापरणे विधिसंमत असेल.

१९१६ चा ७. १९५६ चा १०२. १९६१ चा महा. २८.

**नोंदवहीतून नाव काढून टाकणे.**

**२३.** (१) (क) एखादा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी हा, नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने [9][परिषदेने] केलेल्या रीतसर चौकशीअंती कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे आढळून आल्यास [9][परिषदेस],—

(एक) अशा वैद्यक व्यवसायीस ताकीद देणारे पत्र पाठवता येईल, किंवा

(दोन) अशा वैद्यक व्यवसायीचे नाव—

**(क)** नोंदवहीतून, निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी काढून टाकण्याचा, किंवा

**(ख)** नोंदवहीतून कायमचे काढून टाकण्याचा

निदेश देता येईल.

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १२ (अ) द्वारे " कलमे २० व २१ मध्ये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २३ (क) द्वारे " मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ किंवा मुंबई वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९३८ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे " मुंबई राज्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २३ (ब) द्वारे " किंवा लायसन " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २३ (अ) द्वारे " किंवा यादीत " हा मजकूर वगळण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम २३ (फ) द्वारे " किंवा यादीत आणि अनुक्रमे " हे शब्द वगळण्यात आले.

[7] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १२ (ब) द्वारे " किंवा यथास्थिति व नोंदणीकृत बायोकेमिक वैद्यक व्यवसायी " हे शब्द वगळण्यात आले.

[8] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २३ (ई) द्वारे " यादीत नाव दाखल केलेला होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी किंवा यादीत नाव दाखल केलेला बायोकेमिक वैद्यक व्यवसायी "हा मजकूर वगळण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम २४ (अ) (एक) द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी " परिषद " हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[10] वरील अधिनियमाच्या, कलम २३ (ग) द्वारे समास टीपेतील " किंवा यादीत " हे शब्द वगळण्यात आले.

**स्पष्टीकरण.**–या कलमाच्या प्रयोजनाकरिता " गैरवर्तणूक " या संज्ञेचा अर्थ,–

१९७४ चा २. (एक) ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव होत असेल व जो [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] च्या अर्थांतर्गत दखलपात्र असेल अशा अपराधाबद्दल, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविणे, किंवा

१९७४ चा २. १९५० चा ४६. (दोन) [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] च्या अर्थांतर्गत जो दखलपात्र असेल अशा अपराधाबद्दल, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस लष्करी कायद्याच्या अधीन राहून, सेना अधिनियम, १९५० खाली दोषी ठरविणे, किंवा

(तीन) जी कोणतीही वर्तणूक [२][परिषदेच्या] मते व्यवसायाच्या संबंधात अपकीर्तिकारक असेल अशी वर्तणूक,

असा आहे.

(ख) [२][परिषदेस], पुरेसे कारण देण्यात आल्यावर, अशाप्रकारे काढून टाकलेले वैद्यक व्यवसायीचे नाव नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्तीवर व अशी फी दिल्यावर व [२][परिषद] लादील अशा आणखी शर्तीवर, नोंदवहीत पुन्हा दाखल करण्यात यावे, असा निदेश कोणत्याही वेळी देता येईल.

१९६१ चा महा. २८. १९६५ चा महा. ४६. [३][(२) ' महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ ' अन्वये किंवा ' महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ ' अन्वये किंवा त्या त्या वेळी महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही तत्सम कायद्यान्वये ठेवलेल्या नोंदवहीत अशा कोणत्याही वैद्यक व्यवसायीचे नाव जर दाखल केलेले असेल तर, अशा रीतीने नाव काढून टाकल्याची माहिती, उक्त नोंदवही ठेवण्याची जबाबदारी असलेल्या प्राधिका-यास देणे हे परिषदेचे कर्तव्य असेल.]

[४][(३) जर नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे नाव पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये ठेवलेल्या नोंदवहीतही दाखल केले असेल आणि ते उक्त नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल तर, प्रबंधक, परिषदेच्या मान्यतेने, त्याचे नाव या अधिनियमाखाली ठेवलेल्या नोंदवहीतून देखील काढून टाकील.]

(४) [५][परिषदेला] स्वतःहून किंवा कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावरून, रीतसर व योग्य चौकशी केल्यानंतर आणि संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे एकून घेण्याची संधी दिल्यानंतर, नोंदवहीतील कोणतीही नोंद, जर अशी नोंद कपटाने किंवा चुकीने करण्यात आली होती असे [५][परिषदेचे] मत असेल तर, ती रद्द करता येईल किंवा तीत फेरफार करता येईल.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २४ (अ) (दोन) द्वारे " फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २४ (अ) (एक) द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी " परिषद " हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २४ (ब) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २४ (क) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २४ (ड) द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी " परिषद " हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

(५) पुढील बाबींच्या संबंधात दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयांकडे जे अधिकार निहित असतील, तेच अधिकार या कलमाअन्वये चौकशी करताना [1][परिषदेला] असतील :— १९०८ चा ५.

(क) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे,

(ख) दस्तऐवज सादर करण्यास सक्ती करणे,

(ग) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

(६) या कलमाखालील चौकशीची सर्व कामे ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

(७) [2][(क) परिषदेला किंवा कार्यकारी समितीला, तिच्यासमोर केल्या जाणा-या कोणत्याही चौकशीमध्ये उद्भवणा-या कोणत्याही कायदेविषयक प्रश्नाबाबत सल्ला देण्यासाठी, ज्याने किमान दहा वर्षे,—

(एक) अधिवक्ता अधिनियम, १९६१ अन्वये नाव नोंदणी केलेला अधिवक्ता म्हणून ; किंवा १९६१ चा २५.

(दोन) उच्च न्यायालयाचा न्यायवादी म्हणून ;

काम केलेले असेल अशा न्याय सहायकाची नेमणूक करता येईल.]

(ख) जेव्हा न्याय सहायक, पुरावा, कार्यपद्धती किंवा इतर कोणतीही बाब यासंबंधीच्या कोणत्याही कायदेविषयक प्रश्नाबाबत [3][परिषदेला किंवा कार्यकारी समितीला] सल्ला देईल तेव्हा, तो असा सल्ला चौकशीतील हजर असलेल्या प्रत्येक पक्षकारासमक्ष किंवा अशा पक्षकाराचे प्रतिनिधित्व करणा-या व्यक्तीसमक्ष देईल, किंवा [3][परिषदेने किंवा कार्यकारी समितीने] आपण काढलेल्या निष्कर्षाचा विमर्श करण्यास सुरुवात केल्यानंतर असा सल्ला देण्यात आला असेल तर, न्याय सहायकाने कोणता सल्ला दिला, ते वर निर्दिष्ट केलेल्या अशा प्रत्येक पक्षकारास किंवा व्यक्तीस कळवण्यात येईल. तसेच, [3][परिषदेने किंवा कार्यकारी समितीने] उपरोक्त कोणत्याही अशा प्रश्नाबाबत न्याय सहायकाने दिलेला सल्ला एखाद्या बाबतीत स्वीकारला नाही तर, तेही अशा पक्षकारास किंवा व्यक्तीस कळवण्यात येईल.

(ग) या कलमाखालील कोणत्याही न्याय सहायकाची नेमणूक एकतर सर्वसाधारणपणे करण्यात येईल किंवा कोणत्याही विशिष्ट चौकशीसाठी किंवा चौकशींच्या वर्गासाठी करण्यात येईल व नियमाद्वारे विहित करण्यात येईल असे पारिश्रमिक त्यास देण्यात येईल.

[4][* * *]

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २४ (ई) द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी " परिषद "हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २४ (फ) (एक) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २४ (फ) (दोन) द्वारे " मंडळ " या शब्दाऐवजी हे शब्द त्यांच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २४ (ग ) द्वारे हे पोट-कलम वगळण्यात आले.

**२४.** [१][कलम २० मध्ये ] काहीही अंतर्भूत असले तरी, —

**नोंदणी केली जाण्याचा [८][* * *]; हक्क नसलेल्या व्यक्ती.**

१९५१ चा मुंबई ४८. (एक) मुंबई होमिओपॅथिक अधिनियम, १९५१ या खाली ;

१९५१ चा मध्य-प्रदेश २६. (दोन) मध्यप्रदेश होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५१ या खाली ; किंवा

(तीन) भारतात किंवा भारताच्या कोणत्याही भागात वैद्यक व्यवसायींच्या नोंदणीचे विनियमन करण्याबाबतच्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली,

ठेवलेल्या कोणत्याही नोंदवहीतून [२][* * *] जिचे नाव व्यवसायाच्या संबंधातील अपकीर्तिकारक वर्तणुकीबद्दल काढून टाकण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, तिचे नाव ज्या नोंदवहीतून [३][* * *] काढून टाकले होते त्या नोंदवहीत [३][* * *] ते रीतसर पुन्हा दाखल करण्यात आले नसेल तर, [४][कलम २० अन्वये तयार केलेल्या नोंदवहीत] दाखल करून घेण्यास हक्कदार असणार नाही.

**२५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी, त्याखाली केलेले नियम आणि [५][परिषदेचे ] आदेश यांस अनुसरून नोंदवहीत वेळोवेळी नोंदी दाखल करणे, त्यात सुधारणा करणे आणि नोंदणी प्रमाणपत्रे [६][* * *] देणे हे, प्रबंधकाचे कर्तव्य असेल.

**नोंदवही [९][* * *] ठेवणे.**

(२) जे नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी मरण पावतील किंवा कलम २३, पोट-कलम (१) खाली ज्यांची नावे नोंदवहीतून काढून टाकण्याबद्दल निदेश देण्यात आला असेल, त्यांची नावे त्यातून काढून टाकण्यात येतील.

(३) वैद्यक व्यवसायीच्या जादा अर्हतांसंबंधीच्या किंवा त्याच्या नावातील बदलासंबंधीच्या नोंदीमध्ये करावयाचा फेरफार हा, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी फी भरल्याशिवाय केला जाणार नाही.

[७][(४) * * * * *]

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १३ (अ) द्वारे " कलमे २० व २१ यात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २५ (अ) द्वारे " किंवा यादीतून " हे शब्द वगळण्यात आले.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १३ (ब) द्वारे " किंवा यादीतून " व " किंवा यादीत "हे शब्द वगळण्यात आले;

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २५ (ब) द्वारे " कलमे २० व २१ अन्वये तयार केलेल्या नोंदवहीत किंवा यादीत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २६ (अ) द्वारे " मंडळाचे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ४ द्वारे " व नवीकरण चिठ्ठ्या " हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २६ (ब) द्वारे पोट-कलम (४) वगळण्यात आले.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २५ (क) द्वारे " किंवा यादीत नाव दाखल केले जाण्याचा " हा मजकूर वगळण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम २६ (क) द्वारे " व यादी " हे शब्द वगळण्यात आले.

**नोंदणीचे नवीकरण.** [1]**[२६.** (१) [2][कलम २० मध्ये] काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९७४, (यात यापुढे ज्याचा निर्देश " सुधारणा अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभानंतर,— १९७४ चा महा. ३९.

(क) (एक) प्रबंधक, विहित नमुन्यातील दोन सर्वसाधारण नोटिसा साठ दिवसांपेक्षा कमी नसेल इतके कालांतर ठेवून **राजपत्रात** आणि विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील. अशी पहिली सर्वसाधारण नोटीस, अध्यक्षाच्या मान्यतेने, प्रबंधक ठरवील अशा दिनांकास प्रसिद्ध करण्यात येईल व तीद्वारे सर्व नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींना तसेच सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी या अधिनियमाचे कलम २६ जसे होते त्याप्रमाणे त्या खाली नवीकरणाची जी प्रक्रिया असेल त्या प्रक्रियेमध्ये नोंदवहीमधून ज्यांची नावे काढून टाकण्यात आली असतील त्या व्यक्तींना (यात यापुढे ज्यांचा " कसूरदार " असा निर्देश करण्यात आला आहे) नोंदवहीत आपली नावे असण्याचे चालू राहण्यासाठी प्रबंधकाकडे अर्ज करण्यास फर्माविण्यात येईल आणि त्यासाठी [3][परिषदेस] शंभर रुपये फी आणि कसूरदारांच्या बाबतीत शास्ती म्हणून पंधरा रुपये जादा फी देण्याचे दायित्व त्यांच्यावर राहील याकडे त्यांचे लक्ष वेधण्यात येईल;

(दोन) प्रबंधक, या खंडाच्या उप-खंड (एक) खालील पहिली सर्वसाधारण नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर, प्रत्येक नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस व कसूरदारास, नोंदवहीत नमूद करण्यात आलेल्या त्याच्या पत्त्यावर किंवा यथास्थिति, शेवटी माहीत असलेल्या त्याच्या पत्त्यावर, टपाल दाखला घेऊन अर्जाच्या विहित नमुन्यासह व्यक्तिगत नोटीस पाठवील. तीद्वारे, नोंदवहीत त्याचे नाव असण्याचे चालू राहण्यासाठी रीतसर अर्ज भरून तो शंभर रुपये फी सहित (व कसूरदारांच्या बाबतीत पंधरा रुपये जादा फी), अशी व्यक्तिगत नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत प्रबंधकाकडे परत पाठविण्याबाबत त्यास फर्मावण्यात येईल.

कोणत्याही नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीने किंवा कसूरदाराने, व्यक्तिगत नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत उपरोक्त फीसह असा अर्ज परत पाठवण्यात कसूर केल्यास, प्रबंधक, उप-खंड (एक) खालील दुसरी सर्वसाधारण नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर, अशा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस किंवा कसूरदारास, टपाल दाखला घेऊन, आणखी एक व्यक्तिगत नोटीस अर्जाच्या विहित नमुन्यासह पाठवील व तीद्वारे त्यास त्याचे नाव नोंदवहीत असण्याचे चालू राहण्यासाठी उपरोक्त फी व पाच रुपये जादा फी यांसह तो अर्ज, नंतरची व्यक्तिगत नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत, प्रबंधकाकडे परत पाठवण्याबाबत फर्मावील;

(तीन) नंतरच्या व्यक्तिगत नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत, फीसह अर्ज परत पाठविण्यात आला तर, प्रबंधक, फी मिळाल्याबाबत, तसेच नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचे नोंदणी प्रमाणपत्र, ते या अधिनियमाखाली रीतसर रद्द करण्यात आले नसेल तर, या कलमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, प्रवर्तनात असण्याचे चालू राहील, असे नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस आणि कसूरदारास, टपाल दाखला घेऊन कळवील. प्रबंधक, कसूरदारास नवीन नोंदणी प्रमाणपत्र देईल, ते सुद्धा त्याचप्रमाणे प्रवर्तनात असण्याचे चालू राहील ;

(चार) नंतरच्या व्यक्तिगत नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत, फीसह अर्ज परत पाठविण्यात आला नाही तर, प्रबंधक, कसूरदार वैद्यक व्यवसायीचे नाव, जर ते आधीच काढून टाकण्यात आले नसेल तर, नोंदवहीतून काढून टाकील आणि अशा रीतीने त्याचे नाव काढून टाकले असल्याचे त्याला, टपाल दाखला घेऊन कळवील. अशा रीतीने नाव काढून टाकल्याविषयीची

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ५ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १४ (अ) द्वारे "कलमे २० व २१ यांमध्ये" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २७ (अ) (एक) द्वारे "मंडळास " याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

वस्तुस्थिती **राजपत्रात** तसेच विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल. अशा रीतीने नाव काढून टाकल्यावर, कसूरदार वैद्यक व्यवसायीला देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि प्रबंधक ते वैद्यक व्यवसायीकडून विहित रीतीने काढून घेईल :

परंतु, [१][परिषद] या बाबतीत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत, प्रबंधकाकडे त्याबाबत अर्ज करण्यात आल्यावर, याप्रमाणे काढून टाकलेले नाव किंवा पूर्वीच काढून टाकण्यात आलेले नाव, शंभर रुपये फी व पन्नास रुपयांची जादा फी भरल्यानंतर, नोंदवहीत पुन्हा नोंदविता येईल ; आणि त्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र, जर ते काढून घेण्यात आले असेल तर, वैद्यक व्यवसायीला परत देण्यात येईल आणि ते प्रवर्तनात असण्याचे चालू राहील आणि तोवर ते काढून घेण्यात आले नसेल तर, या खंडाच्या उप-खंड (तीन) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ते देखील प्रवर्तनात असण्याचे चालू राहील.

(ख) आणि त्यानंतर, सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभापासून प्रत्येक पाच वर्षांनी, प्रबंधक साठ दिवसांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालांतराने, विहित नमुन्यात दोन सर्वसाधारण नोटिसा, तशाच रीतीने **राजपत्रात** आणि विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील आणि तीद्वारे सर्व नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींना नोंदवहीत त्यांची नावे असल्याचे चालू राहण्यासाठी प्रबंधकाकडे खंड (क) मध्ये निर्देशिलेली [२][शंभर रुपये किंवा यथास्थिति, तीनशे रुपये] फी न भरता, अर्ज करण्यास फर्मावण्यात येईल आणि त्यानंतर खंड (क) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींची नावे नोंदवहीत असण्याचे चालू राहण्याच्या बाबतीत लागू होतील.

[३][(२) * * * * *.] ]

**फी परत न करणे.**

**२७.** कलमे २०, [४][* * * *] [५][२३], २५ आणि २६ खाली दिलेली फी परत केली जाणार नाही.

**नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीचा हक्क.**

**२८.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) [६][महाराष्ट्र राज्याच्या] विधानमंडळाचे सर्व अधिनियम आणि सर्व केंद्रीय अधिनियम [६][महाराष्ट्र राज्यास] ते लागू असताना, जेथवर ते भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची दोन किंवा सूची तीन यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विषयांशी संबंधित असतील तेथवर, त्या अधिनियामांतील " कायदेशीररीत्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी " किंवा " यथोचित अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी " हा शब्दप्रयोग किंवा वैद्यक व्यवसायी म्हणून किंवा वैद्यक व्यवसायातील व्यक्ती म्हणून कायद्याने मान्यता दिलेली व्यक्ती अशा आशयाचा कोणताही शब्द यांमध्ये, ज्याचे नाव या अधिनियमाखालील नोंदवहीत दाखल केले असेल अशा वैद्यक व्यवसायीचा समावेश होतो ;

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २७ (अ) (दोन) द्वारे "राज्य शासन " या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १४ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २७ (ब) द्वारे पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १५ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[५] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २९ (अ) द्वारे " मुंबई राज्य " याऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(दोन) कोणत्याही अधिनियमान्वये आवश्यक असलेले कोणत्याही वैद्यक व्यवसायीचे किंवा वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र हे, जर त्या प्रमाणपत्रावर ज्याचे नाव या अधिनियमाखालील नोंदवहीत दाखल केलेले असेल अशा वैद्यक व्यवसायीने सही केलेली असेल तर, विधिग्राह्य असेल ;

(तीन) ज्याचे नाव नोंदवहीत दाखल केलेले असेल असा वैद्यक व्यवसायी, राज्य शासनाकडून मदत किंवा अनुदान मिळणा-या आणि होमिओपॅथिक [१][* * * *] वैद्यक पद्धतीअनुसार रुग्णांवर उपचार करणा-या कोणत्याही होमिओपॅथिक [१][* * * *] दवाखान्यात, रुग्णालयात किंवा अपंगालयात किंवा अशा वैद्यक पद्धतीअनुसार कार्य करणा-या कोणत्याही सार्वजनिक आस्थापनेत, निकायात किंवा परिसंस्थेत भिषक किंवा इतर वैद्यकीय अधिकारी म्हणून कोणत्याही जागेवर नेमला जाण्यास पात्र असेल ;

(चार) प्रत्येक नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस, त्याची तशी इच्छा असेल तर, [२][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये मरणान्वेषणाचे काम करण्यापासून] सूट देण्यात येईल. १९७४ चा २.

## प्रकरण पाच

### [३][परिषद] घेईल अशा परीक्षा, [४][आणि] परिसंस्थांना मान्यता [५][* * * *]

**[६][परिषद] घेईल अशा परीक्षा [७][* * *].**

**२९.** [८][परिषद], कलम ३५ खालील उपविधींद्वारे तिने घ्यावयाच्या परीक्षा विहित करील.

[९][* * * *]

**परिसंस्थांना मान्यता देणे.**

**३०.** (१) या कलमाखाली मान्यता दिलेली प्रत्येक परिसंस्था, [१०][केंद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या होमिओपॅथीक वैद्यकपद्धतीमधील वैद्यकीय अर्हता प्रदान करण्यासाठी केंद्रीय परिषदेने केलेल्या विनियमांनुसार] परीक्षांकरिता विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यास हक्कदार असेल.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १६ द्वारे " किंवा बायोकेमिक " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २९ (ब) द्वारे " फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ अन्वये मरणान्वेषणाचे काम करण्यापासून किंवा ज्युरी सदस्य म्हणून काम करण्यापासून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे " विधिसभा " याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १७ (अ) द्वारे " अभ्यासक्रम " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) द्वारे " व पात्रता मान्य करणे " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३१ (क) द्वारे " विधिसभा " याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १८ (ब) द्वारे समास टीपेमधील " व अभ्यासांचे पाठ्यक्रम" हा मजकूर वगळण्यात आला.

[८] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३१ (अ) द्वारे " विधिसभा " याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[९] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १८ (अ) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम १९ (अ) द्वारे " विधिसभेच्या ज्या परीक्षांकरिता तिला मान्यता देण्यात आली असेल त्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) या अधिनियमाखाली मान्यता मिळविण्यास इच्छुक असणारी कोणतीही परिसंस्था, प्रबंधकाकडे अर्ज पाठवील आणि त्यात पुढील बाबींची संपूर्ण माहिती देईल :—

(क) व्यवस्थापक मंडळाची रचना व त्याचे सदस्य ;

(ख) ज्या विषयांचे किंवा पाठ्यक्रमांचे शिक्षण ती देत असेल किंवा देण्याचे तिने योजिले असेल ते विषय व पाठ्यक्रम आणि ज्या परीक्षेसाठी तिला मान्यता पाहिजे असेल ती परीक्षा ;

(ग) जागा, साधनसामग्री आणि ज्यांच्यासाठी ही तरतूद केली असेल किंवा करण्याचे योजिले असेल अशा विद्यार्थ्यांची संख्या ;

(घ) कर्मचारीवर्गाची संख्या, त्यांची वेतने, अर्हता व त्यांनी केलेले संशोधन कार्य ;

(ङ) आकारलेली किंवा आकारावयासाठी योजलेली फी आणि इमारती व साधनसामग्री यांवरील भांडवली खर्चासाठी आणि परिसंस्था पुढे चालू ठेवण्यासाठी व तिचे कामकाज सक्षमतेने चालावे यासाठी केलेली वित्तीय तरतूद :

परंतु, [1][परिषदेने] पोट-कलमे (३) ते (९) खालील निरीक्षण किंवा चौकशी करण्यासाठी किंवा कोणत्याही परीक्षेस उपस्थित राहण्यासाठी प्राधिकृत केलेले कोणतेही निरीक्षक, सदस्य, वीक्षक किंवा इतर कोणत्याही व्यक्ती यांना सर्व सुविधा देण्याच्या बाबतीत परिसंस्थेने लेखी संमती दिल्याखेरीज प्रबंधक कोणताही अर्ज विचारार्थ स्वीकारणार नाही.

(३) प्रबंधक, असा अर्ज [1][परिषदेपुढे] ठेवील आणि [1][परिषद] तिला आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही माहिती मागविण्यासाठी प्रबंधकास निदेश देऊ शकेल. तसेच, [1][परिषद] त्याबाबत तिने प्राधिकृत केलेल्या सक्षम व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून स्थानिक चौकशी करण्याचाही निदेश देऊ शकेल.

(४) अशा स्थानिक चौकशी अहवालाची नोंद केल्यानंतर आणि आवश्यक अशी अधिक चौकशी केल्यानंतर, [1][परिषद] असा अर्ज आपल्या अहवालासह राज्य शासनाकडे पाठवील आणि त्या अहवालात मागितलेली मान्यता द्यावी किंवा देऊ नये याविषयीचे आपले मत नमूद करील. त्यानंतर राज्य शासनास अशी मान्यता देता किंवा नाकारता येईल किंवा त्यास योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीन राहून, अशी मान्यता देता येईल. राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(५) होमिओपॅथिक [2][* *] वैद्यक पद्धतीच्या व्यवसायासाठी [3][केंद्रीय परिषदेने विहित केल्याप्रमाणे] कार्यनिपुणतेचा पुरेसा दर्जा राखणे हे, [1][परिषदेचे] कर्तव्य असेल. असा दर्जा राखण्याच्या प्रयोजनासाठी [1][परिषदेने] त्याकरिता नेमलेल्या निरीक्षकांना किंवा कोणत्याही सदस्यांना किंवा वीक्षकांना मान्यताप्राप्त परिसंस्थांचे आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या रुग्णालयांचे निरीक्षण करण्यासाठी आणि परिसंस्थांकडून घेतल्या जाणा-या सर्व किंवा कोणत्याही परीक्षांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यावेळी उपस्थित राहण्यासाठी परवानगी देण्याबाबत अशा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या नियामक मंडळास किंवा प्राधिका-यांस सांगण्याचा [1][परिषदेस] प्राधिकार असेल. प्रत्येक मान्यताप्राप्त परिसंस्था [1][परिषदेने] वेळोवेळी दिलेल्या कोणत्याही यथायोग्य निदेशांचे अनुपालन करील.

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३२ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी "परिषद" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १९ (ब) (एक) द्वारे "किंवा बायोकेमिक" हा मजकूर वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १९ (ब) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(६) निरीक्षक, सदस्य किंवा वीक्षक हे, कोणत्याही परीक्षा घेण्याच्या कामात हस्तक्षेप करणार नाहीत. परंतु, ज्या कोणत्याही परीक्षेस ते हजर राहतील त्या प्रत्येक परीक्षेची पर्याप्तता किंवा अपर्याप्तता याविषयीचे आपले मत, तसेच अशा परिसंस्थांच्या ज्या बाबींच्यासंबंधात कळवण्याविषयी [१][परिषद] त्यांना फर्मावील अशा इतर कोणत्याही बाबीविषयी आपले मत, [१][परिषदेस] कळवणे, हे त्यांचे कर्तव्य असेल.

(७) [१][परिषद] आपले निरीक्षक किंवा सदस्य किंवा वीक्षक यांच्यामार्फत प्रत्येक मान्यताप्राप्त परिसंस्थेचे व अशा परिसंस्थेकडून घेण्यात येणा-या प्रत्येक परीक्षेचे पाच वर्षांतून किमान एकदा आणि [१][परिषदेला] तसे वाटत असल्यास, वरचेवर निरीक्षण करील.

(८) [१][परिषद] अशा प्रत्येक अहवालाची एक प्रत, ज्या परिसंस्थेच्या संबंधात असा अहवाल तयार करण्यात आला असेल त्या परिसंस्थेच्या प्राधिका-याकडे अग्रेषित करील. तसेच, ती अशा अहवालाची एक प्रत उक्त मंडळाने त्यावर जे कोणतेही अभिप्राय दिले असतील त्यांसह, राज्य शासनाकडे [२][आणि केंद्रीय परिषदेकडे] अग्रेषित करील.

(९) निरीक्षक, सदस्य किंवा वीक्षक यांस कलम ३५ खालील उपविधींद्वारे विहित करण्यात येईल असे पारिश्रमिक मिळेल. असे पारिश्रमिक हे, [१][परिषदेच्या] खर्चाचा एक भाग असेल.

[३][(१०) या कलमाच्या तरतुदी ह्या, होमिओपॅथी केंद्रीय परिषद अधिनियम, १९७३ याच्या या संबंधातील संबद्ध तरतुदींच्या व्यतिरिक्त असतील आणि त्या, त्यांना न्यूनकारी नसतील.] १९७३ चा ५९.

**परिसंस्थांची मान्यता काढून घेणे.**

**३१.** कलम ३० खाली मान्यता दिलेली कोणतीही परिसंस्था, [४][केंद्रीय परिषदेच्या] आवश्यकतांनुसार प्रशिक्षणाचा पुरेसा दर्जा राखत नाही, असे राज्य शासनास [५][परिषदेच्या किंवा केंद्रीय परिषदेच्या अहवालावरून] दिसून आले तर, राज्य शासनास अशा परिसंस्थेस दिलेली मान्यता कोणत्याही वेळी काढून घेता येईल :

परंतु, मान्यता काढून घेण्यासाठी या कलमाखाली कोणताही निदेश देण्यापूर्वी, आवश्यक तो दर्जा संपादन करण्यासाठी जर [६][परिषदेने] असा अहवाल दिला असेल तर, [६][परिषदेकडून] व इतर कोणत्याही बाबतीत राज्य शासनाकडून त्या परिसंस्थेस तो दर्जा संपादन करण्यासाठी वाजवी संधी व अवधी देण्यात येईल.

**३२.** [पहिल्या अनुसूचीची सुधारणा] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २१ द्वारे वगळण्यात आले.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३२ द्वारे "विधिसभा" याऐवजी "परिषद" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १९ (क) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १९ (ड) द्वारे हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २० (ब) द्वारे "परिषदेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २० (अ) द्वारे "परिषदेच्या किंवा अन्यथा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३३ द्वारे "विधिसभेने " या मजकुराऐवजी "परिषद" हा शब्द त्याच्या व्याकराणीक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

## प्रकरण सहा

## संकीर्ण

**३३.** (१) राज्य शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील आणि ते आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तींच्या अधीन असतील. **नियम.**

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमांत पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) [१][कलम ४ अन्वये ज्यावेळी, ज्या ठिकाणी व ज्या रीतीने परिषदेच्या सदस्यांची, अध्यक्षाची व उपाध्यक्षाची निवडणूक घेण्यात येईल] ती वेळ, ते ठिकाण आणि ती रीत ;

[२][(ख) कलम १०, पोट-कलम (१) अन्वये परिषदेची सभा ज्या रीतीने बोलवण्यात, भरविण्यात येईल व ज्या रीतीने तिचे कामकाज चालविण्यात येईल ती रीत ;]

[३][(ग) कलम १२ [४][ * * * *] अन्वये द्यावयाची फी व इतर भत्ते ;]

[५][(घ) कलम १४, खंड (थ) अन्वये परिषदेचे इतर अधिकार, कर्तव्ये व कार्ये ;]

(ङ) कलम १५ खालील प्रबंधकाचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती ;

[६][(ङ क) [७][कलम १५ **क** अन्वये] कार्यकारी समितीच्या सदस्यांची संख्या, पदावधी, त्यांची नैमित्तिकरीत्या रिक्त झालेली पदे भरण्याची रीत व त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती ; [७][ आणि कार्यकारी समितीकडे प्रत्यायोजित करण्यात आलेले परिषदेचे अधिकार, कर्तव्ये व कार्ये ;] ]

[८][ * * * * * * * * *]

(छ) कलम २०, पोट-कलम (२), खंड (ङ) खाली नोंदवहीत नमूद करावयाचा तपशील ;

[९][ * * * * * * * * *]

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३५ (अ) द्वारे " अनुक्रमे कलम ४ व कलम १७ खाली मंडळाची व विधिसभेची निवडणूक घेण्यात येईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३५ (ब) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ६ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३५ (क) द्वारे " आणि कलम १२ व कलम १७ अन्वये " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३५ (ङ ) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[६] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ७ (अ) (दोन) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३५ (ई) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ३५ (फ) द्वारे हा खंड वगळण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ३५ (ग) द्वारे हा खंड वगळण्यात आला.

[१][(झ) कलम २० अन्वये नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचे नमुने आणि अशा नमुन्यांसोबत द्यावयाची कागदपत्रे ;]

(ञ) कलम २०, [२][* * * *] खाली चौकशी करण्याची रीत ;

[३][(ट) कलम २०, पोट-कलम (१२) [४][* * * *] अन्वये नोंदणी प्रमाणपत्रांचे नमुने ;

(ट क) कलम २०, पोट-कलम (१२), खंड (ग) अन्वये, नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत देण्यासाठी आकारणीयोग्य फी आणि अर्जाचा नमुना ;]

(ठ) कलम २२ अन्वये ज्या रीतीने अभिवचन देण्यात येईल ती रीत ;

(ड) कलम २३ खाली चौकशी करण्याची रीत ; त्या कलमाअन्वये नाव काढून टाकण्यात आलेल्या वैद्यक व्यवसायीचे नाव पुन्हा दाखल करण्याच्या शर्ती व त्याबाबतची फी, आणि त्या कलमाअन्वये नेमलेल्या न्याय सहायकांना द्यावयाचे पारिश्रमिक ;

(ढ) कलम २५, पोट-कलम (३) अन्वये जादा अर्हता किंवा नावातील बदल यासंबंधीच्या नोंदीत फेरफार करण्यासाठी आकारावयाची फी ;

[५][* * * * * * * *]

(थ) या अधिनियामाअन्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब ;

(द) या अधिनियमाच्या उद्देशांपैकी कोणतेही उद्देश पुरस्सृत करणे.

[६][(३) या कलमाखाली केलेले सर्व नियम, ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे तीस दिवसांहून कमी नाही इतक्या कालावधीकरिता ठेवण्यात येतील, आणि ते ज्या अधिवेशनात याप्रमाणे ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात विधानमंडळ त्यात जे फेरबदल करील व **राजपत्रात** प्रसिद्ध करील त्या फेरबदलांच्या अधीन असतील.]

**विनियम.** **३४.** (१) [७][परिषदेस] राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, पुढील बाबींसाठी या अधिनियमाशी किंवा त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील :—

(क) कलम १५, पोट-कलम (६) खालील प्रबंधकाहून अन्य असलेले तिचे इतर अधिकारी व कर्मचारी यांची संख्या व पदनामे, वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती ;

(ख) [७][परिषदेस] या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा बाबी.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३५ (ह) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३५ (आय) द्वारे " आणि कलम २१, पोट-कलम (९) " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३५ (जे) द्वारे मूळ खंड (ट) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २२ द्वारे " आणि कलम २१, पोट-कलम (३) " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ६ द्वारे खंड (ण) व (त) वगळण्यात आले.

[६] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ७ (६) द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३६ द्वारे "मंडळ " या शब्दाऐवजी " परिषद " हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(२) राज्य शासनाला विनियमांचा मसुदा मिळाल्यावर ते विनियम मंजूर करता येतील किंवा ते मंजूर करण्याचे नाकारता येतील किंवा त्यास योग्य वाटतील अशा फेरबदलांच्या अधीन राहून, ते मंजूर करता येतील किंवा ते अधिक विचाराकरिता [१][परिषदेकडे] परत पाठवता येतील.

(३) सर्व विनियम, ते मंजूर करण्यात येतील तेव्हा **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(४) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणताही विनियम रद्द करता येईल.

**३५.** (१) [२][परिषदेस] राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, पुढील बाबींसाठी, या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे उपविधी करता येतील :— **उपविधी.**

(क) तिने घ्यावयाच्या परीक्षा ;

[३][* * * * * * *]

(घ) जे परीक्षा उत्तीर्ण होतील त्यांना प्रदान करावयाची पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा तशाच प्रकारचा इतर कोणताही पुरस्कार आणि अशी पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा पुरस्कार प्रदान करण्याची रीत ;

(ङ) ज्या भाषेत परीक्षा घेण्यात येईल ती भाषा ;

[४][ (च) नेमण्यात आलेले परीक्षक, प्राश्निक, नियामक आणि इतर व्यक्ती यांना द्यावयाची फी आणि अशा परीक्षा घेण्यासाठी आकारावयाची फी ; ]

[५][* * * * * * * * * *]

(ज) मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(झ) मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये ज्या भाषेत शिक्षण देता येईल ती भाषा ;

(ञ) निरीक्षक किंवा सदस्य किंवा वीक्षक यांना द्यावयाचे पारिश्रमिक ;

(ट) निरीक्षकांसह, तिच्या सर्व अधिका-यांची व कर्मचा-यांची संख्या व त्यांचे पदनाम, वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती ;

(ठ) [६][परिषदेला] या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक अशा इतर बाबी.

(२) राज्य शासनाला उपविधींचा मसुदा मिळाल्यानंतर, ते उपविधी मंजूर करता येतील किंवा ते मंजूर करण्याचे नाकारता येतील किंवा त्यास योग्य वाटतील अशा फेरबदलांच्या अधीन राहून, ते मंजूर करता येतील किंवा ते अधिक विचाराकरिता [६][परिषदेकडे] परत पाठविता येतील.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३६ द्वारे “मंडळ ” या शब्दाऐवजी “ परिषद ” हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे “ विधिसभेस ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २३ (अ) द्वारे खंड (ख) व (ग) वगळण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २३ (ब) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २३ (क) द्वारे खंड (छ) वगळण्यात आला.

[६] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३७ द्वारे “विधिसभा ” या शब्दाऐवजी “परिषद ” हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(३) सर्व उपविधी, ते मंजूर करण्यात येतील तेव्हा, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(४) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणताही उपविधी रद्द करता येईल.

**राज्य शासनाचे नियंत्रण.** **३६.** (१) [१][परिषदेने] या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली तिला प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यामध्ये कसूर केली आहे किंवा अशा कोणत्याही अधिकारांचा अतिक्रम किंवा दुरूपयोग केला आहे, किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तिला प्रदान केलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यात कसूर केली आहे किंवा अन्यथा तिने काम करण्याचे बंद केले आहे किंवा ती काम करण्यास असमर्थ झाली आहे असे राज्य शासनाला कोणत्याही वेळी दिसून आले तर आणि राज्य शासनास अशी कसूर, असा अतिक्रम किंवा दुरुपयोग गंभीर स्वरूपाचा आहे असे वाटत असेल तर, त्याचा तपशील यथास्थिति, [१][परिषदेला] कळवता येईल, आणि राज्य शासन याबाबतीत निश्चित करील अशा कालावधीत जर [१][परिषद] अशी कसूर, असा अतिक्रम किंवा दुरुपयोग सुधारण्यास अपयशी ठरेल तर, राज्य शासनाला [१][परिषद] विसर्जित करता येईल, आणि त्यास, [१][परिषदेच्या] सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा किंवा कर्तव्यांचा, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून आणि [२][त्यास योग्य वाटेल अशा दोन वर्षांहून अधिक नसेल एवढ्या कालावधीकरिता वापर करण्याची व पार पाडण्याची व्यवस्था करता येईल. असा कालावधी राज्य शासनास योग्य वाटल्यास त्यास तो वेळोवेळी वाढवता येईल ; तथापि, असा संपूर्ण कालावधी एकूण [३][सात वर्षांपेक्षा] अधिक असणार नाही व राज्य शासन] [४][नवीन परिषदेची] रचना करण्यासाठी उपाययोजना करील :

[५][परंतु, याप्रमाणे नेमलेल्या आणि पद धारण करणा-या व्यक्तीचा पदावधी हा, मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८८ याच्या प्रारंभाच्या दिवसापासून वाढविण्यात आल्याचे किंवा अशा अधिनियमाच्या प्रारंभानंतर रचना करण्यात आलेल्या परिषदेच्या पहिल्या सभेच्या दिनांकानंतरच्या लगतपूर्व दिनांकास समाप्त होत असल्याचे मानण्यात येईल.] १९८८ चा महा. १९.

(२) या अधिनियमात, नियमांत, विनियमांत किंवा उपविधींत काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याचा किंवा कोणतीही कार्ये पार पाडण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या [६][परिषदेची] किंवा कोणत्याही इतर प्राधिकरणाची विधिग्राह्य रीतीने रचना किंवा नेमणूक करण्यात आलेली नाही, असे कोणत्याही वेळी राज्य शासनाला दिसून आले तर, राज्य शासनाला, अशा अधिकारांपैकी किंवा कार्यांपैकी कोणत्याही अधिकाराचा किंवा कोणत्याही कार्याचा त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीकरवी व अशा रीतीने व सहा महिन्यांहून अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता व त्यास योग्य वाटतील अशा शर्तींच्या अधीन राहून, वापर करण्याची व पार पाडण्याची व्यवस्था करता येईल.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३८ (अ) (एक) द्वारे “मंडळ किंवा विधिसभा ” आणि “ यथास्थिति मंडळ किंवा विधिसभा ” याऐवजी “ परिषद ” हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २ द्वारे “ त्यास योग्य वाटेल अशा दोन वर्षांहून अधिक नाही इतक्या मुदतीपर्यन्त चालविण्याची किंवा पार पाडण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार आहे व त्याने ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २ द्वारे “ साडेसहा वर्षांपेक्षा ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३८ (अ) (दोन) द्वारे “ यथास्थिति नवीन मंडळाची किंवा विधिसभेची ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २४ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३८ (ब) द्वारे “मंडळ किंवा विधिसभा ” याऐवजी “ परिषद ” हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[१][ **(३)** प्रशासकाला, राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील असे वेतन व भत्ते परिषदेच्या निधीतून देण्यात येतील.]

**३७.** या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेले नियम किंवा विनियम किंवा उपविधी यांखाली सदभावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टींबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. **या अधिनियमाखाली काम करणा-या व्यक्तींना मिळणारे हानिरक्षण.**

## प्रकरण सात

## निरसन व संक्रमणकालीन तरतुदी

**३८.** (१) या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीन राहून, नियत दिवशी,— **निरसन व व्यावृत्ती.**

१९५१ चा मुंबई ४८. (क) दुस-या राज्यात घातलेले प्रदेश वगळून, पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास लागू असलेला मुंबई होमिओपॅथिक अधिनियम, १९५१ ; आणि

१९५१ चा मध्य-प्रदेश २६. (ख) मुंबई राज्याच्या विदर्भ विभागास लागू असलेला मध्यप्रदेश होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५१,

हे निरसित होतील.

१३१२ फसलीचा हैद्राबाद १. (२) मुंबई राज्याच्या हैद्राबाद प्रदेशास लागू असलेला वैद्यक अधिनियम हा, नियत दिवसापासून होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायींना लागू असण्याचे बंद होईल.

१९५१ चा मुंबई ४८. १९५१ चा मध्य-प्रदेश २६. (३) [२][ * * * ] मुंबई होमिओपॅथिक अधिनियम, १९५१ याचे कलम ३८, पोट-कलम (१) चे खंड (क) ते (ई) आणि मध्यप्रदेश होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५१ याचे कलम २९, पोटकलम (१) चे खंड (ड) ते (ह) खाली केलेले विनियम आणि नियत दिवशी राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील असे उक्त अधिनियमाखाली केलेले इतर विनियम व नियम हे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींखाली व त्या तरतुदींच्या प्रयोजनांकरिता केले आहेत असे मानण्यात येईल आणि या अधिनियमाखाली केलेले कोणतेही नियम, विनियम किंवा उपविधी यांअन्वये ते अधिक्रमित करण्यात आले नसतील तर व अधिक्रमित करण्यात येईतोपर्यंत, त्याप्रमाणे अंमलात असतील. उक्त अधिनियमाखाली केलेले इतर सर्व विनियम व नियम अंमलात असण्याचे बंद होईल.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३८ (क) द्वारे हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २५ (अ) द्वारे " कलम ४२, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने " हा मजकूर वगळण्यात आला.

[1][*        *        *        *        *]

(५) नियत दिवसाच्या निकटपूर्वी, मुंबई होमिओपॅथिक अधिनियम, १९५१ खाली केलेली, काढलेली किंवा दिलेली, तसेच दुस-या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात अंमलात असलेली कोणतीही नेमणूक, अधिसूचना, नोटीस, आदेश किंवा नमुना, तो या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींखाली करण्यात, काढण्यात किंवा देण्यात आल्याचे मानण्यात येईल, आणि या अधिनियमाखाली करण्यात आलेली कोणतीही नेमणूक, काढण्यात आलेली अधिसूचना, नोटीस, देण्यात आलेला आदेश किंवा नमुना यांच्याद्वारे अधिक्रमित करण्यात आला नसेल तर व अधिक्रमित करण्यात येईतोपर्यंत त्याप्रमाणे संपूर्ण मुंबई राज्यभर अंमलात असेल. १९५१ चा मुंबई ४८.

**हक्क, कर्तव्ये, इत्यादी परिषदेकडे निहित करणे आणि व्यावृत्ती.**

[2] **[३९.** कलम ३, पोट-कलम (१), च्या खंड (क) अन्वये स्थापन केलेल्या ‘ महाराष्ट्र होमिओपॅथी [3][* * * *] परिषदे ’ची स्थापना केल्याच्या दिनांकास व तेव्हापासून (या कलमात ज्याचा निर्देश “उक्त दिनांक ” असा करण्यात आला आहे) खालील आनुषंगिक परिणाम घडून येतील, ते असे :—

(क) जे मंडळ व विधिसभा, ‘ मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५ ’ याच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या दिवशी विसर्जित झाले होते (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश “विसर्जित मंडळ व विधिसभा” असा करण्यात आला आहे) आणि कलम ३६ खाली नियुक्ती केलेली व्यक्ती (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त व्यक्ती” असा करण्यात आला आहे) ज्याचे अधिकार वापरीत होती व ज्याची कर्तव्ये पार पाडीत होती असे ‘ होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक पद्धती मंडळ, मुंबई ’ आणि ‘ होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक पद्धती परीक्षण विधिसभा, मुंबई ’ उक्त दिनांकास कायमची विसर्जित होईल आणि विसर्जित मंडळाचे किंवा विधिसभेचे सर्व हक्क उक्त दिनांकास परिषदेकडे निहित होतील ; १९८८ चा महा. १६.

(ख) उक्त दिनांकाच्या निकटपूर्व दिवशी विसर्जित मंडळाकडे आणि विधिसभेकडे निहित असलेली सर्व स्थावर किंवा जंगम मालमत्ता, त्या दिवशी अंमलात असलेल्या सर्व मर्यादांच्या आणि शर्तीच्या अधीन राहून, परिषदेकडे निहित होईल ;

(ग) कोणत्याही बाबीपोटी विसर्जित मंडळाला आणि विधिसभेला येणे असलेल्या सर्व रकमा परिषदेने वसूल करण्यायोग्य असतील व विसर्जित मंडळ आणि विधिसभा यांना किंवा उक्त व्यक्तीस उक्त दिनांकापूर्वी जी उपाययोजना करण्याची किंवा जी कार्यवाही दाखल करण्याची मुभा राहिली असती, अशी कोणतीही उपाययोजना करण्यास किंवा अशी कोणतीही कार्यवाही दाखल करण्यास ही परिषद सक्षम असेल ;

(घ) विसर्जित मंडळ आणि विधिसभा किंवा उक्त व्यक्ती त्यांच्या द्वारे किंवा त्यांच्या वतीने पत्करण्यात आलेली उक्त दिनांकाच्या निकटपूर्वी किंवा उक्त दिनांकास अस्तित्वात असलेली सर्व ऋणे, दायित्वे व आबंधने ही, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करणा-या परिषदेने पत्करली असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार ती पुढे प्रवर्तनात राहतील ;

(ङ) उक्त दिनांकाच्या निकटपूर्वी, कोणत्याही प्राधिकरणापुढे किंवा अधिका-यापुढे प्रलंबित असलेल्या सर्व कार्यवाही आणि बाबी ह्या, मुंबई होमिओपॅथिक आणि बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५ द्वारे, सुधारण्यात आलेल्या, या अधिनियमाखाली अशा कार्यवाही व बाबी विचारार्थ स्वीकारण्यास सक्षम असलेल्या तत्सम प्राधिकरणाकडे किंवा अधिका-याकडे हस्तांतरित झाल्याचे मानण्यात येईल आणि त्या त्यांच्यापुढे चालू राहतील. १९८८ चा महा. १६.

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २५ (ब) द्वारे पोट-कलम (४) वगळण्यात आले.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ३९ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम ३९ दाखल करण्यात आले.

[3] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २६ (अ) द्वारे “व बायोकेमिस्ट्री ” हा मजकूर वगळण्यात आला.

(च) विसर्जित मंडळ आणि विधिसभा किंवा उक्त व्यक्ती यांनी किंवा त्यांच्या वतीने किंवा त्यांच्या विरूद्ध दाखल करण्यात आलेले सर्व खटले आणि विसर्जित मंडळ आणि विधिसभा किंवा उक्त व्यक्ती यांनी किंवा त्यांच्या विरूद्ध किंवा अशा कोणत्याही विसर्जित मंडळाच्या आणि विधिसभेच्या किंवा उक्त व्यक्तीच्या वतीने, विसर्जित मंडळाचा आणि विधिसभेचा कोणताही अधिकारी याने दाखल केलेले किंवा त्यांच्या विरूद्ध दाखल केलेले, उक्त दिनांकास प्रलंबित असलेले सर्व दावे व इतर न्यायालयीन कार्यवाही परिषदेकडून किंवा परिषदेविरुद्ध पुढे चालू ठेवण्यात येतील ;

(छ) विसर्जित मंडळाकडे आणि विधिसभेकडे उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी सेवेत असलेले प्रबंधक आणि सर्व अधिकारी व कर्मचारी हे, परिषदेने नेमलेले प्रबंधक, अधिकारी व कर्मचारी होतील आणि उक्त दिनांकास त्यांना जे वेतन व भत्ते आणि सेवानिवृत्ति लाभ मिळण्याचा हक्क असेल ते वेतन व भत्ते आणि सेवानिवृत्ति लाभ त्यांना मिळतील व त्या दिनांकास ते ज्यांच्या अधीन असतील त्या सेवेच्या शर्तींच्या ते अधीन रहातील :

परंतु, (एक) उक्त दिनांकापूर्वी अशा प्रबंधकाने, अधिका-यांनी आणि कर्मचा-यांनी दिलेली सेवा ही, परिषदेची सेवा असल्याचे मानण्यात येईल ;

(दोन) जर एखादा अधिकारी किवा कर्मचारी हा, अतिरिक्त असल्याने त्याची सेवा आवश्यक नाही किंवा परिषदेच्या सेवेच्या गरजेनुरूप ते नाहीत, असे परिषदेचे मत असेल तर, परिषद, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची सेवा समाप्त करू शकेल, आणि ज्यांची सेवा अशा प्रकारे समाप्त करण्यात आलेली असेल असा अधिकारी किंवा
१९८८ कर्मचारी हा, मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५
चा महा. [1][आणि मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (दुसरी सुधारणा) अधिनियम,
१६. १९८८] अंमलात आले नसते तर, विसर्जित मंडळाच्या आणि विधिसभेच्या सेवेतून अक्षमतेमुळे बाद
१९८८ होऊन त्याला जी रजा, निवृत्तिवेतन, उपदान किवा अन्य लाभ मिळण्यास तो पात्र ठरला असता
चा महा. ती रजा, निवृत्तिवेतन, उपदान व अन्य लाभ परिषदेकडून मिळण्यास तो पात्र ठरेल आणि त्याला
१९. परिषद, राज्य शासनाच्या मंजुरीने ठरवील अशी आणखी रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळू शकेल ;

(ज) या अधिनियमान्वये धारण केलेली कोणतीही नियुक्ती किंवा काढलेली कोणतीही अधिसूचना, नोटीस, काढलेले कोणतेही आदेश, केलेले कोणतेही नियम, उपविधी, ठेवलेली कोणतीही नोंदवही, दिलेले कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र, मान्यता किंवा दिलेला नमुना हा, उक्त दिनांकापूर्वी अस्तित्वात व अंमलात असेल तेव्हा, ते सर्व जेथवर मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा)
१९८८ अधिनियम, १९८५ [2][ आणि मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (दुसरी सुधारणा)
चा महा. अधिनियम, १९८८] द्वारे सुधारण्यात आलेल्या ह्या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर,
१६. मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५ [2][ आणि मुंबई
१९८८ होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८८] द्वारे सुधारण्यात
चा महा. आलेल्या अशा या अधिनियमान्वये धारण केलेल्या, काढलेल्या, ठेवलेल्या किंवा मंजूर केलेल्या
१९. कोणत्याही नियुक्तीद्वारे, अधिसूचनेद्वारे, नोटिशीद्वारे, आदेशाद्वारे, नियमाद्वारे, उपविधीद्वारे, नोंदवहीद्वारे, नोंदणी प्रमाणपत्राद्वारे, मान्यतेद्वारे किंवा नमुन्याद्वारे निष्प्रभावित होईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.]

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २६ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २६ (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**४०.** [ विधिसभेचे विसर्जन व नवीन विधिसभेची नेमणूक] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४० द्वारे वगळण्यात आले.

**४१.** [ प्रबंधकांसंबंधीची तरतूद ] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४० द्वारे वगळण्यात आले.

**४२.** [ परीक्षांसंबंधातील तरतूद ] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४० द्वारे वगळण्यात आले.

**४३.** [ मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या संबंधातील तरतूद ] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४० द्वारे वगळण्यात आले.

**४४.** [ हक्क, कर्तव्ये इ. निहित असणे. ] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४० द्वारे वगळण्यात आले.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**४५.** [१][ मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८५] [२][ किवा मुंबई होमिओपॅथिक व बायोकेमिक वैद्यक व्यवसायी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८८] [१][ द्वारे सुधारणा केलेल्या अशा ] अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, [१][ उक्त [३][ सुधारणा अधिनियमाच्या ] प्रांरभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत ] कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, अशी अडचण दूर करण्यासाठी, राज्य शासनाला त्याप्रसंगी आवश्यक किंवा इष्ट वाटेल, अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल.

१९८८ चा महा. १६.
१९८८ चा महा १९.

**विवक्षित अधिनियमितींची सुधारणा.**

[४][**४६.** दुस-या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या अधिनियमितीमध्ये, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व त्या मर्यादेपर्यंत सुधारणा करण्यात येतील.]

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४१ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २७ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २७ (ब) द्वारे "सुधारणा अधिनियमाच्या" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४२ द्वारे मूळ कलम ४६ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

## पहिली अनुसूची

[सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २८ द्वारे वगळण्यात आली ]

## [1][दुसरी अनुसूची

(कलम ४६ पहा)

| | अधिनियमाचा क्रमांक व वर्ष (१) | अधिनियमाचे संक्षिप्त नाव (२) | | सुधारणा (३) |
|---|---|---|---|---|
| | १९६१ चा महाराष्ट्र २८. | महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१. | **१.** | कलम **२०** मध्ये,— |
| | | | (क) | पोट-कलम (२), खंड (ब) मधील “किंवा यादीत ” आणि “किंवा उक्त यादी ” हा मजकूर वगळण्यात येईल; |
| | | | (ख) | पोट-कलम (३), मधील “यथास्थिति ” हा शब्द व “किंवा यादीतही ” आणि “उक्त यादीतून ” हा मजकूर वगळण्यात येईल. |
| | | | **२.** | कलम **३३,** पोट-कलम (१), खंड (दोन) मधील “किंवा यादीत ” हा मजकूर वगळण्यात येईल. |
| | | | **३.** | कलम **३३-अ**, पोट-कलम (१) मधील “त्या कलमात ” याऐवजी “कलम ३३ मध्ये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | **४.** | कलम **३५,** पोट-कलम (१), खंड (ड) मधील “परीक्षक विधिसभा ” याऐवजी “परिषद ” हा शब्द दाखल करण्यात येईल. |
| १८९८ चा ५. | १९६५ चा महाराष्ट्र ४६. | महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५. | **१.** | कलम **२२** मध्ये,— |
| | | | (क) | पोट-कलम (१) च्या स्पष्टीकरणातील “फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ” याऐवजी “फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ” हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९७४ चा २. | | | (ख) | पोट-कलम (२) मध्ये,—<br>(एक) खंड (क) मधील “किंवा यादीत ” हा मजकूर वगळण्यात येईल;<br>(दोन) खंड (ख) मधील “किंवा यादीत ” हा मजकूर वगळण्यात येईल;<br>(तीन) “किंवा उक्त यादी ” हा मजकूर वगळण्यात येईल; |
| | | | (ग) | पोट-कलम (३) मधील “यथास्थिति ” हा शब्द व “किंवा यादीतही ” आणि “किंवा उक्त यादीतून ” हा मजकूर वगळण्यात येईल.] |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४४ अन्वये मूळ अनुसूचीऐवजी दुसरी अनुसूची दाखल करण्यात आली.